# विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात एकूण ४१४० उमेदवार



**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याचा सोमवारी (दि. ४) शेवटचा दिवस होता. अंतिमतः राज्यात एकूण चार हजार १४० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अर्ज वैध ठरलेल्या एकूण सात हजार ७८ उमेदवारांपैकी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत दोन हजार ९३८ उमेदवारांनी माघार घेतली आहे. जळगाव शहर आणि छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक २९, तर नंदूरबारच्या शहादा मतदारसंघात केवळ तीन उमेदवार रिंगणात आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघात नऊ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात १२, तर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बारामतीत २३ उमेदवार राजकीय नशीब आजमावत आहेत.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १०९
www.ramprahar.com

मंगळवार, ५ नोव्हेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'विधानसभे'साठी राज्यात एकूण ९.७ कोटी मतदार/२
दिवाळीतही स्वच्छतेला प्राधान्य; कचरा गोळा/६
महाराष्ट्राची कबड्डी लीग मे महिन्यात/८

# रायगडातील लढतींचे चित्र स्पष्ट

## अर्ज माघारीनंतर प्रचाराला येणार वेग

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीसाठी रायगड जिल्ह्यातील लढतींचेही चित्र स्पष्ट झाले आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची सोमवार (दि. ४) ही अंतिम मुदत होती. या कालावधीत काही उमेदवारांनी माघार घेतली. याबरोबरच कोण कोण रिंगणात उरले आहेत आणि लढती कशा असणार हे स्पष्ट झाले. यानंतर आता निवडणूक प्रचाराला वेग येणार आहे.

### निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मतदारसंघनिहाय संख्या





| मतदारसंघ | वैध | माघार घेतलेले | रिंगणात |
|---|---|---|---|
| पनवेल | २३ | १० | १३ |
| कर्जत | १३ | ४ | ९ |
| उरण | १६ | २ | १४ |
| पेण | १५ | ८ | ७ |
| अलिबाग | २३ | ९ | १४ |
| श्रीवर्धन | १३ | २ | ११ |
| महाड | ८ | ३ | ५ |
| एकूण | १११ | ३८ | ७३ |

**पनवेल :** या मतदारसंघात १५पैकी अनिल गणपत मोंडे (बळीराजा सेना) आणि सुदाम जगू जरग (रासप) या दोन उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे आता १३ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर (भाजप), लीना अर्जुन गरड (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), बाळाराम दत्तात्रय पाटील (शेकाप), योगेश जनार्दन चिले (मनसे), गजेंद्र कृष्णकांत अहिरे (बसपा), कांतीलाल हरिश्चंद्र कडू (लोकमुद्रा जनहित पार्टी), पवन उत्तम काळे (भारतीय जन सम्राट पार्टी), वसंत उत्तम राठोड (डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन पार्टी), संतोष शरद पवार (रिपब्लिकन पार्टी), चेतन नागेश भोईर, प्रकाश रामचंद्र चांदिवडे, बाळाराम महादेव पाटील, बाळाराम गौऱ्या पाटील (अपक्ष) निवडणूक लढवत आहेत.

**उरण :** या मतदारसंघात १६पैकी संतोष हिराजी ठाकूर व जितेंद्र दामोदर म्हात्रे या दोन अपक्ष उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे आमदार महेश रतनलाल बालदी (भाजप), माजी आमदार मनोहर गजानन भोईर (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), प्रितम जनार्दन म्हात्रे (शेकाप), सत्यवान पंढरीनाथ भगत (मनसे) सुनील मारुती गायकवाड (बसपा), महेश गणपत कोळी (लोकराज्य पक्ष), कृष्णा पांडुरंग वाघमारे (ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक), श्रीकन्या तेजस डाकी, कुंदन प्रभाकर घरत, निलम मधुकर कडू, बाळकृष्ण धनाजी घरत, मनोहर परशुराम भोईर, प्रितम धनाजी म्हात्रे, प्रितम बळीराम म्हात्रे (अपक्ष) असे १४ उमेदवार रिंगणात आहेत.

**कर्जत :** तीन उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने कर्जत मतदारसंघात नऊ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. भाजपचे पदाधिकारी व अपक्ष उमेदवार किरण ठाकरे तसेच अपक्ष उमेदवार नमिता सुधाकर घारे आणि किशोर साळुंखे यांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता आमदार महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना), नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), श्रीराम बळीराम महाडिक (बसपा), सुधाकर परशुराम घारे, जाविद अकदास खोत, महेंद्र लक्ष्मण थोरवे, विशाल विष्णू पाटील, सुधाकर यादवराव घारे, सुधाकर शंकर घारे (अपक्ष) रिंगणात आहेत.

**पेण :** या विधानसभा मतदारसंघात आठ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले असून सात उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत. निवडणूक लढवत असलेल्या उमेदवारांमध्ये आमदार रविशेठ पाटील (भाजप), प्रसाद खेळूराम भोईर (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), अतुल नंदकुमार म्हात्रे (शेकाप), अनुजा केशव साळवी (बसपा), मंगल परशुराम पाटील (अभिनव भारत), देवेंद्र मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी), विश्वास मधुकर बागुल (अपक्ष) यांचा समावेश आहे. दुसरीकडे कौसल्या रवींद्र पाटील, पल्लवी प्रसाद भोईर, सुरेश नामदेव खैरे, नमिता नंदकुमार म्हात्रे, संजय रघुनाथ म्हात्रे, दशरथ मोतीराम साळवी, नरेश गजानन पाटील, प्रसाद सूर्यकांत वेदक यांनी माघार घेतली आहे.

**अलिबाग :** आठ जणांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. यामध्ये आमदार महेंद्र हरी दळवी (शिवसेना), चित्रलेखा नृपाल पाटील ऊर्फ चिऊताई (शेतकरी कामगार पक्ष), अनिल बबन गायकवाड (बसपा), दिलीप विठ्ठल भोईर ऊर्फ छोटमशेठ, दिलीप गोविंद भोईर, अमर रवींद्र फुंडे, श्रीनिवास सत्यनारायण मटपरती, आनंद रंगनाथ नाईक, अजय श्रीधर म्हात्र, महेंद्र आत्माराम दळवी, महेंद्र कृष्णा दळवी, महेंद्र वसंत दळवी, सुभाष ऊर्फ पंडित पाटील (अपक्ष) यांचा समावेश आहे, तर सुरेंद्र म्हात्रे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), राजा ठाकूर (काँग्रेस), मंदार एकनाथ गावंड (अपक्ष) यांच्यासह एकूण आठ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

**श्रीवर्धन :** या विधानसभा मतदारसंघात ज्ञानदेव मारुती पवार (अपक्ष) यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता एकूण ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत. यामध्ये मंत्री आदिती सुनील तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस), अनिल नवगणे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष), अश्विनी साळवी (बसपा), फैसल पोपेरे (मनसे), कृष्णा कोबनाक (बळीराजा सेना), अनंत बाळूजी गीते, अश्रफ खान दादा खान पठाण, मोहम्मद कासीम बुराहउद्दीन सोलकर, युवराज भुजबळ, राजाभाऊ ठाकूर, संतोष तानाजी पवार (अपक्ष) हे उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

**महाड :** आठपैकी तीन उमेदवारांनी माघार घेतल्याने महाड मतदारसंघात पाच उमेदवार रिंगणात राहिले आहेत. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांमध्ये आमदार भरत मारुती गोगावले, स्नेहल माणिक जगताप (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), अमृता अरुण वाघमारे (बसपा), आनंदराज रवींद्र घाडगे (वंचित बहुजन आघाडी) आणि प्रज्ञा लक्ष्मण खांबे (अपक्ष) यांचा समावेश आहे; तर श्रेयस माणिक जगताप (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), आनंद नथुराम भोरगावकर (अपक्ष) आणि आकाश अशोक पांचाळ (संभाजी ब्रिगेड) यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे.

# मनोज जरांगे निवडणूक रिंगणाबाहेर

**जालना : प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीतून मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी माघार घेतली आहे. याआधी ते राज्यातील विविध मतदारसंघातून उमेदवार उभे करणार आहेत. ठरलेल्या मतदारसंघातून त्यांच्या उमेदवारांनी अर्जही भरले होते, मात्र सोमवारी (दि. ४) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी सर्वच उमेदवारांना अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले.

एका जातीवरून कोणीही निवडून येऊ शकत नाही एवढे माझे राजकीय आकलन आहे. एवढ्या ताकदवान पक्षांनाही एकत्र यावे लागले. राजकीय प्रक्रिया हाताळणे ही साधी गोष्ट नाही. मी तर या राजकीय प्रकरणात लेकरू आहे. आंदोलनात हजार, पाचशे लोक असले तरी चालून जाते, मात्र राजकारणात लोकांची गोळाबेरीज करावी लागते, असे म्हणत मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली.

महायुती आणि महाविकास आघाडी कुणाचाही दबाव नाही. मराठा समाज जर एकटा लढला, तर निवडून येणार नाही. मित्रपक्षाची यादी आलेली नाही. एका जातीवर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. त्यामुळे समाज बांधवांनी आपापले अर्ज काढून घ्यावेत, असे आवाहन जरांगे यांनी केले आहे.

## शेट्टींची माघार, सरवणकर ठाम

**मुंबई : प्रतिनिधी**

बोरीवली विधानसभा मतदारसंघातून भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. दुसरीकडे माहीम मतदारसंघात शिवसेना उमेदवार आमदार सदा सरवणकर यांनी आपला अर्ज कायम ठेवला आहे. या मतदारसंघातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात असून भाजपने त्यांना पाठिंबा दिला आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या एका तास आधी सरवणकर हे राज ठाकरेंची भेट घेण्यासाठी दाखल झाले होते, मात्र राज यांनी भेट नाकारली. त्यानंतर सरवणकर निवडणूक लढवण्यावर ठाम राहिले आहेत.

## पनवेल, उरण, पेणमध्ये 'मविआ'त बिघाडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधासनभा निवडणुकीत पनवेल, उरण, पेण मतदारसंघामध्ये महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. त्यामुळे या तिन्ही मतदारसंघात आता तिरंगी लढत पहायला मिळणार आहे.

रायगडातील शेकाप हा महाविकास आघाडीसोबत राहिलेला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पनवेल, अलिबाग आणि पेणची जागा शेकापला सोडण्याची घोषणा केली होती, पण उरणमध्ये शेकापचे प्रितम म्हात्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीत त्यांनी माघार न घेतल्याने पनवेल मतदारसंघात 'उबाठा'ने आपला उमेदवार कायम ठेवला. त्यामुळे पनवेलमध्ये महायुतीकडून भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर, महाविकास आघाडीतून 'उबाठा'च्या लीना गरड आणि शेकापकडून माजी आमदार बाळाराम पाटील निवडणुकीला सामोरे जातील.

उरणमध्ये महायुतीकडून आमदार महेश बालदी, महाविकास आघाडीतून 'उबाठा'चे माजी आमदार मनोहर भोईर आणि शेकापतर्फे प्रितम म्हात्रे निवडणूक लढवणार आहेत. पेणमध्ये आमदार रविशेठ पाटील यांच्याव्यतिरिक्त 'उबाठा'कडून प्रसाद खेळूराम भोईर आणि शेकापकडून अतुल नंदकुमार म्हात्रे परस्पराविरोधात रिंगणात आहेत.

## निवडक

### उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळून ३६ प्रवाशांचा मृत्यू

**डेहराडून :** उत्तराखंडमधील अल्मोडा दरीत प्रवासी बस कोसळून ३६ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. अपघातानंतर एसडीआरएफच्या पथकांकडून मदत आणि बचावकार्य सुरू करण्यात आले. जे लोक जखमी झाले आहेत त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या दुर्घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी शोक व्यक्त केला आहे.

### विवेक फणसळकर यांच्याकडे महासंचालकपदाचाही कार्यभार



**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आल्यानंतर या पदाचा तात्पुरता कारभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. पुढील आदेश येईपर्यंत फणसाळकर यांच्याकडे पोलीस महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार असणार आहे. भारतीय पोलीस सेवेच्या १९८९ तुकडीतील अधिकारी असलेले फणसळकर हे पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत.

# कोल्हापूरमध्ये काँग्रेसला धक्का!

## उमेदवार मधुरिमाराजे यांनी अर्ज घेतला मागे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी कोल्हापूरच्या राजकारणात मोठा ट्विस्ट झाला. काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी त्यांचा अर्ज मागे घेतला. त्यामुळे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आणि आमदार सतेज पाटील यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.



कोल्हापूर उत्तर विधानसभेसाठी सुरुवातीला काँग्रेसचे माजी नगरसेवक राजू लाटकर यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर अवघ्या २४ तासांमध्ये काँग्रेसने त्यांचा उमेदवार बदलला आणि मधुरिमाराजे छत्रपती यांचे नाव जाहीर करण्यात आले. मग लाटकर यांनी अपक्ष अर्ज भरला होता. ते निवडणूक लढवण्यास ठाम होते. त्यानंतर शेवटच्या क्षणी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे छत्रपती यांनी आपला अर्ज मागे घेतला.

आता महाविकास आघाडीकडून काँग्रेसमधून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार राजेश लाटकर यांना पाठिंबा देण्यात येणार आहे. या मतदारसंघातून महायुतीकडून शिवसेनेचे राजेश क्षीरसागर मैदानात आहेत.

### सतेज पाटील भडकले

दरम्यान, काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार मधुरिमाराजे यांनी माघार घेतल्यानंतर काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सतेज पाटील भडकल्याचे दिसून आले. तुम्ही माझी फसवणूक केली. दम नव्हता तर उभारायचे नव्हते ना. मग मीपण दाखवली असती माझी ताकद, असे म्हणत पाटील यांनी त्यांचा राग व्यक्त केला.



# आमदार प्रशांत ठाकूर यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल विधानसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी आणि मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून प्रचारात मोठी बाजी मारली आहे.

पनवेलमध्ये विकासात्मक परिवर्तन करण्याचे काम कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. पनवेल शहराचा विकास होताना त्यांनी ग्रामीण भागातही विशेष लक्ष घातले. १५ वर्षांपूर्वी ग्रामीण भागात सार्वजनिक सुविधा बघायला मिळत नव्हत्या. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व हाती घेतल्यानंतर झपाट्याने विकास झाला. त्यामुळे प्रचारादरम्यान जागोजागी त्यांचे जोरदार स्वागत केले जात असून महिलांकडून त्यांचे औक्षण करून त्यांना शुभेच्छा आणि ज्येष्ठांकडून भरभरून आशीर्वाद दिला जात आहे.

# भात कापणी, झोडणीच्या कामांना वेग





**खोपोली : प्रतिनिधी**

पाऊसाची पूर्ण उसंत व कडक ऊन पडण्यास सुरुवात झाली असल्याने दिवाळीनंतर भात कापणी व झोडणीच्या कामाला वेग आला आहे. सर्वत्र शेतीची कामे जोरदार सुरू आहेत.

दिवाळीसोबतच दुसरीकडे विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरू असताना बळीराजा आपल्या मूळ शेती कामात गुंतला असल्याचे चित्र आहे. या वर्षी भात पीक चांगले होते, मात्र परतीच्या पावसामुळे काही प्रमाणावर नुकसान झाले असले तरी आहे त्या पिकाची कापणी व झोडणी करून पिवळे सोने घरात आणण्यात शेतकरीवर्ग रममाण झाला आहे.

कापणी व झोडणी या दोन्ही कामांसाठी आदिवासी मजूर उपयोगी पडत असून गावागावात सकाळपासून यासाठी धावपळ सुरू होते. दुपारी कडक उन्हात घामाच्या धारा निघत असल्या तरी भात कापणीसोबत झोडणीची कामे जोरदार सुरू असल्याचे चित्र आहे.

## दोन शिकारी अटकेत; बंदूक, काडतुसे जप्त

**खोपोली : प्रतिनिधी**

शिकारीच्या तयारीत असलेल्या तुळशीराम रमेश पिरकड (वय २६, रा. तिघर वावर्ले, ता. खालापूर) आणि तुकाराम नथू भवर (वय ३८, रा. लोधिवली ठाकूरवाडी, ता. खालापूर) या दोघांना खोपोली पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून ठासणीची बंदूक आणि दोन काडतुसे जप्त केली आहेत.

तुळशीराम आणि तुकाराम रविवारी (दि. ३) संध्याकाळी ५च्या सुमारास दुचाकीवरून मुंबई-पुणे महामार्गाने जात असताना सायमाळ गावच्या हद्दीत पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याजवळ विनापरवाना ठासणीची बंदुक आणि दोन काडतुसे आढळली. त्यामुळे दोघांनाही अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# नवी मुंबईत तब्बल ३१ अपक्ष उमेदवार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ऐरोली आणि बेलापूर विधानसभा मतदारसंघात प्रमुख राजकीय पक्षांबरोबरच अपक्षांची गर्दी पहायवास मिळत आहे. दोन्ही मतदारसंघात मिळून तब्बल ३१ अर्ज आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची सोमवारी (दि. ४) अंतिम मुदत होती. ऐरोलीतून २० आणि बेलापूर मतदारसंघामधून २७ अर्ज भरले गेले होते. अर्ज मागे घेण्याच्या मुदतीपर्यंत बेलापूर मतदारसंघात नऊ जणांनी अर्ज मागे घेतल्याने १४ उमेदवार रिंगणात आहेत, तर ऐरोली मतदारसंघात तीन जणांनी माघार घेतल्याने १७ उमेदवार रिंगणात आहेत.

बेलापूर मतदारसंघात महायुतीकडून लढणाऱ्या भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे, महाविकास आघाडीतर्फे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार व माजी आमदार संदीप नाईक, अपक्ष म्हणून लढणारे शिवसेनेचे बंडखोर नेते विजय नाहटा, मनसेचे गजानन काळे व शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार मंगेश आमले यांच्यात होणार आहे.

ऐरोली मतदारसंघात महायुतीतर्फे भाजपचे आमदार गणेश नाईक, महाविकास आघाडीतर्फे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे एम.के. मढवी व शिवसेनेतून बंडखोरी केलेले अपक्ष उमेदवार विजय चौगुले, मनसेचे निलेश बाणखेले व स्वराज्य पक्षाचे अंकुश कदम यांच्यात आहे.

दरम्यान, सकल मराठा समाजानेही आपले उमेदवार रिंगणात उतरवण्याचे ठरवले होते, मात्र खुद्द मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून बाहेर पडत राज्यातील उमेदवारांना माघार घेण्यास सांगितले. त्यांचा आदेश मानून नवी मुंबईतील मराठा मोर्चा समर्थक डॉ. अमरदीप गरड यांनी बेलापूरमधून आणि ऐरोलीतून विनोद पोखरकर यांनी अर्ज मागे घेतले.

# राज्यात २८८ मतदारसंघात ९.७ कोटी मतदार


## पाच जिल्ह्यांमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे, तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत.

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे.



यामध्ये पुरुष मतदार सहा लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार सहा लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार सहा लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार सहा लाख ६७ हजार २१७ आहेत.

गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार पाच लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार पाच लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये चार तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार पाच लाख सहा हजार ९७४ आणि महिला मतदार पाच लाख नऊ हजार ८९२ आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार सहा लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये तीन तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार तीन लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार तीन लाख ४१ हजार ९३४ आहेत.

अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. सोलापूरमध्ये ३८ लाख ४८ हजार ८६९, अहमदनगरमध्ये ३७ लाख ८३ हजार ९८७, जळगावमध्ये ३६ लाख ७८ हजार ११२, कोल्हापूरमध्ये ३३ लाख पाच हजार ९८ आणि औरंगाबादमध्ये ३२ लाख २ हजार ७५१ मतदार आहेत. बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या १० जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत.

### ४.६९ कोटी महिला मतदार

राज्यात विधानसभेसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. एकूण ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांची नोंद आहे ज्यामध्ये ५ कोटी २२ हजार ७३९ पुरुष, ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला आणि ६ हजार १०१ तृतीयपंथी मतदार आहेत.

# अलिबाग मतदारसंघातून आठ जणांची माघार

## चार महेंद्र दळवी, दोन दिलीप भोईरांसह १४ जण रिंगणात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग विधासभा मतदारसंघात आठ जणांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. चार महेंद्र दळवी, दोन दिलीप भोईर यांच्यासह १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत.

अलिबाग विधानसभा मतदारसंघात २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली होती. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसा अखेरपर्यंत (दि. २९) २२ उमेदवारांचे २८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. ३० ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी करण्यात आली. त्यात समीर रमाकांत पाटील या अपक्ष उमेदवाराचा अर्ज अवैध ठरला. २२ उमेदवारांचे २७ अर्ज वैध ठरले. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी (दि.४) शिवसेना ठाकरे गटाचे सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेसचे वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष राजा ठाकूर यांच्यासह एकूण आठ जणांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. १४ जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात चार महेंद्र दळवी, दोन दिलीप भोईर यांचा समावेश आहे.

महेंद्र हरी दळवी (शिवसेना), मंदार एकनाथ गावंड (अपक्ष), चित्रलेखा नृपाल पाटील (शेतकरी कामगार पक्ष), दिलीप विठ्ठल भोईर (अपक्ष), दिलीप गोविंद भोईर (अपक्ष), अमर रविंद्र फुंडे (अपक्ष), अनिल बबन गायकवाड (बहुजन समाज पार्टी), श्रीनिवास सत्यनारायण मटपरती (अपक्ष), आनंद रंगनाथ नाईक (अपक्ष), अजय श्रीधर म्हात्रे (अपक्ष), महेंद्र आत्माराम दळवी (अपक्ष), महेंद्र कृष्णा दळवी (अपक्ष), महेंद्र वसंत दळवी (अपक्ष), सुभाष ऊर्फ पंडित पाटील (अपक्ष) हे १४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत.

मतदारसंघात खरी लढत ही शिवसेनेचे महेंद्र दळवी आणि शेकापच्या चित्रलेखा पाटील यांच्यातत होणार असून अपक्ष उमेदवार दिलीप भोईर कशी टक्कर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पेणमधून आठ उमेदवारांची माघार

## सात उमेदवार निवडणूक रिंगणात; मात्र तिरंगी लढत

**पेण : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदारसंघामध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी १५पैकी आठ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, सात उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे पेण विधानसभा मतदारसंघात सप्तरंगी लढत पहायला मिळेल. तरी खरी लढत ही अतुल म्हात्रे, रवींद्र पाटील आणि प्रसाद भोईर यांच्यामध्ये पहायला मिळणार आहे.

यामध्ये भाजपकडून रविशेठ पाटील, शिवसेना उबाठा गट प्रसाद भोईर, शेकाप अतुल म्हात्रे, बहुजन समाज पार्टी अनुजा साळवी, अभिनव भारत मंगल परशूराम पाटील, वंचित बहुजन आघाडी देवेंद्र कोळी, तर अपक्ष म्हणून विश्वास बागुल हे उमेदवार आहेत. जरी सात उमेदवार असले तरी खरी लढत ही अतुल म्हात्रे, रवींद्र पाटील आणि प्रसाद भोईर यांच्यामध्ये पहायला मिळणार आहे.

माघार घेणाऱ्या उमेदवारांमध्ये कौसल्या रवींद्र पाटील, पल्लवी प्रसाद भोईर, सुरेश नामदेव खैरे, नमिता नंदकुमार म्हात्रे, संजय रघुनाथ म्हात्रे, दशरथ मोतीराम साळवी, नरेश गजानन पाटील, प्रसाद सूर्यकांत वेदक यांचा समावेश आहे. अंतिम उमेदवार अर्जामध्ये उमेदवारांना आपल्या निशाणीदेखील मिळालेल्या आहेत. अतुल म्हात्रे (शिट्टी), रवींद्र पाटील (कमळ), प्रसाद भोईर (मशाल), अनुजा साळवी (हत्ती), देवेंद्र कोळी (गॅस सिलेंडर), मंगळ पाटील (माईक), विश्वास बागुल (इस्त्री) आहे.

# श्रीवर्धनमध्ये ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**श्रीवर्धन** : येथील विधानसभा क्षेत्रामध्ये सोमवारी (दि.४) अर्ज मागे घेण्याच्या दिवशी ज्ञानदेव मारुती पवार (अपक्ष) यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. आता एकूण ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत.

यामध्ये आदिती सुनील तटकरे (महायुती), अनिल नवगणे (मविआ), आश्विनी साळवी (बहुजन समाज पक्ष), फैसल पोपेरे(मनसे), अनंत बाळूजी गीते (अपक्ष), अश्रफ खानदादा खान पठाण (अपक्ष), कृष्णा कोबनाक (बळीराजा सेना), मोहम्मद कासीम बुराहउद्दीन सोलकर (अपक्ष), युवराज भुजबळ (अपक्ष) राजाभाऊ ठाकूर (अपक्ष), संतोष तानाजी पवार (अपक्ष), ज्ञानदेव मारुती पवार यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रामध्ये या वेळेला सात उमेदवार अपक्ष निवडणूक लढवत आहेत. आदिती तटकरे यांनी मागच्या निवडणुकीत जवळजवळ ४० हजार मतांनी विजय संपादन केला होता. आदिती तटकरे व अनिल नवगणे यांच्यातच खऱ्या अर्थाने लढत होईल.

# महाड विधानसभा निवडणूक रिंगणात पाच उमेदवार

**महाड : प्रतिनिधी**

१९४ महाड विधानसभा निवडणुकीत आठ उमेदवारांपैकी पाच उमेदवार रिंगणात राहिले असून खरी लढत शिवसेना व उद्धव ठाकरे गटात आपआपसांत होणार आहे. अद्यापतरी निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडताना दिसत नसला तरी सोशल मीडियावरून प्रचाराचे रान उठल्याचे दिसत आहे.

महाड विधानसभा मतदारसंघात महाड, पोलादपूर व माणगाव या तीन तालुक्यांचा समावेश होतो. यामध्ये एकूण दोन लाख ९६ हजार ३८८ मतदार आहेत. या वेळी आठ उमेवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते, मात्र सोमवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच उमेदवार रिंगणात असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

यामध्ये शिवसेनेचे भरत मारुती गोगावले, उबाठाच्या स्नेहल माणिक जगताप, बहुजन समाज पार्टीच्या अमृता अरुण वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे अनंदराज रवींद्र घाडगे, अपक्ष प्रज्ञा लक्ष्मण खांबे यांचा समावेश आहे. उमेदवार जरी पाच असले तरी खरी लढत ही शिवसेनेचे भरत गोगावले व उबाठाच्या स्नेहल जगताप यांच्यात होणार आहे.

गोगावले हे तीनवेळा आमदार म्हणून निवडून आले असून ही त्यांची चौथी वेळ असून एकंदर मतदारसंघाचा आढावा घेतला तर गोगावले यांचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला खरे चित्र स्पष्ट होईल.



**नागोठणे : भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते वैकुंठ पाटील यांना वाढदिवसानिमित्त रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, क्रीडा संयोजक शेखर गोळे, ज्ञानेश्वर शिर्के, तालुका उपाध्यक्ष विठोबा माळी, प्रमोद नागोठणेकर यांनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : शामकांत नेरपगार)

## बाळाराम पाटील यांना आता नवे चिन्ह

**पनवेल** : विधानसभा निवडणुकीमध्ये शिट्टी या चिन्हावर मी लढवत असल्याचे उमेदवार बाळाराम पाटील यांनी कामोठे येथील महाविद्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

निवडणूक आयोगाने शेकापचे खटारा हे चिन्ह गोठवले आहे. म्हणून नवीन चिन्ह घेण्यात आले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जी.आर. पाटील, पनवेल जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, शहर जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, माजी नगरसेवक शंकर म्हात्रे, प्रमोद भगत, शेकाप कामोठे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल, इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये तिघांची माघार; नऊ उमेदवार रिंगणात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत विधानसभा मतदारसंघात सोमवारी नामांकन अर्ज मागे घेण्याच्या निर्धारित मुदतीत १२पैकी तीन उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने विधानसभा निवडणुकीत नऊ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. भाजपचे बंडखोर उमेदवार किरण ठाकरे यांनी माघार घेतली आहे. दरम्यान कर्जत विधानसभा मतदारसंघात आता महायुतीचे महेंद्र सदाशिव थोरवे, महाविकास आघडीचे नितीन सावंत विरूद्ध अपक्ष सुधाकर परशुराम घारे अशी तिरंगी लढत होणार आहे.

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्याची २९ ऑक्टोबर ही शेवटची मुदत होती. या निर्धारित वेळेत १५ उमेदवारांनी १४ अर्ज दाखल केले होते.छाननीमध्ये १३ उमेदवार यांचे १२ नामांकन अर्ज वैद्य ठरले होते. त्या अर्जांपैकी भाजपचे पदाधिकारी आणि अपक्ष उमेदवार किरण ठाकरे तसेच अपक्ष उमेदवार नमिता सुधाकर घारे आणि किशोर साळुंखे यांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये आता नऊ उमेदवार रिंगणात राहिले असून तीन प्रमुख उमेदवारांमध्ये लढत अपेक्षित आहे. कर्जत मतदारसंघात विद्यमान आमदार महेंद्र सदाशिव थोरवे हे महायुतीचे उमेदवार म्हणून तर नितीन सावंत हे महा विकास आघाडीचे उमेदवार म्हणून आणि अपक्ष उमेदवार सुधाकर परशुराम घारे असे तीन प्रमुख उमेदवार यांच्यात तिरंगी लढत अपेक्षित आहे.

**मतदारसंघातील अंतिम उमेदवार** : **महेंद्र सदाशिव थोरवे शिवसेना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष नितीन नंदकुमार सावंत, बसपा श्रीराम बळीराम महाडिक, अपक्ष जाविद अकदास खोत, महेंद्र लक्ष्मण थोरवे अपक्ष, विशाल विष्णू पाटील अपक्ष, सुधाकर परशुराम घारे अपक्ष, सुधाकर यादवराव घारे अपक्ष, सुधाकर शंकर घारे अपक्ष.**

# उमेश चौधरी यांच्या गायनाचा कार्यक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडचे सुपुत्र उमेश चौधरी यांनी दीपसंध्या संगीत महोत्सावात आपल्या सुमधूर गायकीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या सौजन्याने व संगीत कलामंच, डोंबिवली आयोजित दोन दिवसीय कार्यक्रम दीपसंध्या संगीत महोत्सव डोंबिवली मधील टिळकनगर शाळेच्या पेंढरकर सभागृहात पार पडला. हा महोत्सव शास्त्रीय संगीतावर आधारित होता. या कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पहिल्या दिवशी प्रथम अम्रीता मोरे यांचे सुश्राव्य सतारवादन झाले. त्यांनी जयजयवंती हा राग सादर केला. त्यानंतर योगेश हुन्सवाडकर यांनी राग पूर्वी सादर केला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात रूपक पवार यांचे तबलावादन झाले. त्यांनी ताल तीनताल पेशकारी केली. त्यानंतर उमेश चौधरी यांनी केदार रागातील ख्याल गायकी सादर केली. त्यांच्या अबीर गुलाल या अभंगाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी स्वामी कृपा कधी करणार या सुंदर भैरवीने पहिल्या दिवसाची सांगता केली.

दुसऱ्या दिवशी महेश कुलकर्णी यांच्या पुरीया कल्याण या रागातील पेशकारीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर हिंदुस्थानी संगीत अकादमीचे संचालक विनायक नाईक यांचे तबलावादन झाले. त्यांनी ताल तीनतालची पेशकारी केली. त्यांची विद्यार्थिनी भक्ती जाधव हिने सहवादन केले. विदुषी पंडीता शुभदा पराडकर यांच्या जयजयवंती रागाने कार्यक्रमाची सांगता झाली. ठुमरी, कजरा, टप्पा गायनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या शुभदाताईंनी उपस्थित श्रोत्यांच्या आग्रहास्तव शेवटी भैरवी रागातील टप्पा सादर केला.

या महोत्सवात तबल्यावर निशाद पवार, नितीन डेगवेकर, गिरीश आठल्ये, प्रवीण करकरे, आणि विनायक नाईक यांनी हार्मोनियमवर वासुदेव रिसबुड, मंदार दिक्षित, या कलाकारांनी साथसंगत दिली तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तनुश्री जोग यांनी केले.

## प्रा. वामन केंद्रे यांची निशुल्क मॅजिक ऑफ ॲक्टींग कार्यशाळा

**मुंबई : प्रतिनिधी**

रंगपीठ थिएटर आणि श्री छत्रपती शिवाजी स्मारक ट्रस्ट मुंबईच्या वतीने नाट्य दिग्दर्शक आणि प्रशिक्षक पद्मश्री प्रा.वामन केंद्रे यांच्या मॅजिक ऑफ ॲक्टींग या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन ८, ९ व १० नोव्हेंबरदरम्यान राजर्षी शाहु सभागृह, दादर येथे आयोजित करण्यात आली आहे.

८ व ९ नोव्हेंबर रोजी सायं. ६.३० ते ९.३० आणि १० नोव्हेंबरला सकाळी ११ ते २ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ही १६ ते ६० वर्ष या वयोगटातील कलांवतांसाठी असणार आहे. या कार्यशाळेत अभिनयाची जादु काय असते, या क्षेत्रात भविष्य घडविण्यासाठी काय करावे लागते तसेच अभिनयाचे प्रकार, अभिनयाच्या शैली, भुमिकेचा अभ्यास, संभाषण म्हणजे काय? त्याचे मूळ व्याकरण, प्रभावी संभाषणाची तत्वे कोणती या विषयीचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे. नाटक, चित्रपट, दूरदर्शन, जाहिरात, वेब सिरिज, रेडिओ, व्हॉईस ओव्हर आदी माध्यमांमध्ये करिअर करण्यासाठी काय करावे याचे तपशीलवार मार्गदर्शनही केले जाईल. ही कार्यशाळा निःशुल्क असुन या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी, अभिनय व आवाज या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या कलावंतानी सदर कार्यशाळेत प्रवेश घेण्यासाठी (७०३९४७५५३७/९८२०८६८६२८) या नंबरवर संपर्क साधून आपले नाव नोंदवावे अथवा rangpeeth theatremumbaigmail.com येथे संपर्क साधावा असे आवाहन रंगपीठ थिएटर मुंबईच्या गौरी केंद्रे यांनी व श्री छत्रपती शिवाजी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ब्रिगेडिअर सुधीर सावंत यांनी केले आहे.

# दिवाळी पहाट कार्यक्रमांमधून मतदार जागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक संपूर्ण राज्यात एकाच दिवशी होत असून यामध्ये प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजवावा याकरिता मतदार जागरुकता कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येत आहेत.

दिवाळी कालावधीत ठिकठिकाणी आयोजित केल्या जाणाऱ्या दिवाळी पहाट सांगितिक कार्यक्रमांमध्येही ऐरोली व बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप कार्यक्रमाशी संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून मतदानाविषयी प्रबोधन केले.



वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात १ व ३ नोव्हेंबर रोजी आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमाप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांना मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले, तसेही नाट्यगृहामध्ये दररोज होणाऱ्या नाट्यप्रयोग व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सुरुवातीला, मध्यंतरात व कार्यक्रम संपल्यानंतर मतदान करण्याचे आवाहन करणारी ध्वनीफित प्रसारित करण्यात येत आहे. अशाचप्रकारे ज्वेल ऑफ नवी मुंबई नेरुळ येथे, करावेगाव येथे तसेच ऐरोली येथे शिवकॉलनी व विविध ठिकाणी आयोजित दिवाळी पहाटच्या सांगितीक कार्यक्रमांप्रसंगी स्वीप पथकाने उपस्थित राहत मतदान करण्याविषयी आवाहन करत जागरुकता निर्माण केली. राजर्षी शाहू महाराज विद्यालय, आंबेडकरनगर, रबाळे येथील दिवाळी संध्या उपक्रमातही मतदार जनजागृती करण्यात आली.

## अभीष्टचिंतन!




**खोपोली : भाजप शहराध्यक्ष रमेश रेट्रेकर यांचा वाढदिवस महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. या वेळी शहरातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

## दुखवटा

### विक्रमशेठ परमार



**पाली** : पालीतील महात्मा फुले समता परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष विक्रमशेठ परमार यांचे नुकतेच रविवारी (दि.३) वयाच्या ५२व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन भाऊ व चार बहिणी असा मोठा परिवार आहे. विक्रम परमार हे मंत्री छगन भुजबळ यांचे ते कट्टर समर्थक होते.

# पनवेलमध्ये मतदान जनजागृतीला वेग

## स्वीप कार्यक्रमांतर्गत महापालिकेतर्फे नागरिकांना पत्रकांचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४च्या पार्श्वभूमीवर पनवेल मतदारसंघामध्ये मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता जनजागृती करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे निर्देशानुसार व स्वीप प्रमुख शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

या कार्यक्रमांतर्गत सोमवारी (दि.४) आशा सेविकांमार्फत कमी मतदान झालेल्या ठिकाणी मतदारांना घरोघरी व्यक्तिशः भेट देऊन मतदान करण्याबाबत आवाहन पत्रकांचे वाटपाचे काम सुरू करण्यात आले. तसेच पनवेल पालिका हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी, चौकांमध्ये मुव्हिंग आईसी व्हॅनद्वारे मतदान जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये मतदानाचे महत्व सांगणारे, मतदानाबद्दल माहिती देणारे व्हिडिओ आणि फोटोज् स्क्रीनवर दाखवण्यात येत आहेत. याबरोबरच घंटागाडीच्या माध्यमातून मतदानाबाबत माहिती सांगणारे ऑडीओ क्लिप वाजविण्यात येत आहेत.





येत्या २० नोव्हेंबर रोजी पनवेल विधानसभेची निवडणुक होणार असून या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची (सिस्टेमॅटिक वोटर्स एज्युकेशन इलेक्ट्रोल पार्टिसिपेशन प्रोग्रॅम) अमंलबजावणी पनवेल अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात केली जात आहे. स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यासाठी स्वीप पथक प्रमुख शहरअभियंता संजय कटेकर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयामध्ये तसेच शाळांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच प्रभातफेरी, बाईक रॅली, सायकल रॅली काढणे, वक्तृत्व, घोषवाक्ये, चित्रकला स्पर्धा, बचत गटातील महिलांची बैठक व रॅली काढण्यात येत आहे.

कार्यक्रम राबविण्यासाठी अभियंता गजानन देशमुख, अभियंता प्रसाद परब, डेएनयुएलमच्या विनया म्हात्रे, नवनाथ पवार, महापालिका अधिकारी, कर्मचारी मेहनत घेत आहेत.



**पनवेल : दिवाळीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव पवार, गव्हाण येथील प्राचार्य गोवर्धन गोडगे, बबन साळुंखे, रिटघर येथील प्राचार्य गोवर्धन गोडगे आदींनी सदिच्छा भेट घेतली.**



**पनवेल : दै. किल्ले रायगडच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी 'किल्ले रायगड'चे संपादक प्रमोद वालेकर, सहसंपादक प्रदीप वालेकर, उपसंपादक तुषार तटकरी उपस्थित होते.**

# कोप्रोली गणेश मंदिरात 'दिवाळी पहाट'

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोप्रोली येथील गणेश मंदिरात दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने सचिन रत्नाकर प्रोडक्शनच्या स्वरा देवेंद्र पाटील प्रस्तुत, मराठी भजन, भावगीते, भक्तीगीते आणि अभंगांनी नटलेल्या दिवाळी पहाट या कार्यक्रमात सप्तसुरांची उधळण झाल्याचे पाहायला मिळाले.



प्रारंभीच सुंदर ते ध्यान..उभे विटेवरी या गीतातून धनश्री कोळी (बंडा) यांनी आपल्या सुरवटीतून, जणू समोर विठ्ठल उभा करून रसिकांना प्रत्येक्ष विठू माऊलीचे दर्शन घडविले. तर उठ पंढरीच्या राजा या गीतातून देवेंद्र पाटील यांनी विठ्ठलाला साद घालत, रंगमंचावर आमंत्रित केलं. राम का गुणगाण करिये या हिंदी भजनातून ध्रुव म्हात्रे यांनी श्री रामाची आळवणी केली.

गुरुबंधू देवेंद्र, धनश्री आणि ध्रुव या तिघांनी त्रयींनी निः शंक होई रे मना, निर्भय होई रे मना अशक्य ही शक्य करतील स्वामी....! हा स्वामी समर्थांचा तारक मंत्र आळवून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'संत गोरा कुंभार' या नाटकातील नाट्यपद गायिका धनश्री कोळी (बंडा) यांनी गायले. तर भक्ती वाचूनी मुक्तीची,मज जडली रे व्याधी..विठ्ठला......मीच खरा अपराधी....अशी विठ्ठलाला देवेंद्र पाटील यांनी आर्त साद घालत पुन्हा एकदा विठ्ठल उभा केला.

धिरेंद्र ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. माजी प्राचार्य डी.बी.पाटील यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मनोगतातून या गायकांचे तोंड भरून कौतुक केले.

# मैथिली ठाकूरच्या गायनाने दिवाळी संध्या सुरमयी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवशंभो सामजिक विकास मंडळाच्या वतीने आयोजीत दिवाळी संध्या हा सुरमयी संगीताचा कार्यक्रम रविवारी (दि.३) रोडपालीमध्ये झाला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर हीने आपल्या आवाजाने सर्वांनाचा भुरळ घातली. या कार्यक्रमामुळे कळंबोलीवासीयांची दिवाळी आणखीनच गोड झाली असून हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन या सांस्कृतीक कर्याक्रमाचा आस्वाद घेतला.





दिवाळी सण मोठ्या उल्लासपूर्ण वातावरणात साजरा झाला. या उत्सावास आनंद द्विगुणीत करण्यासाठी शिवशंभो सामाजिक विकास मंडळाच्यावतीने कळंबोली सेक्टर १६ मधील रोडपाली बस डेपोजवळ सुप्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर हीच्या दिवाळी संध्या हा गायनाचा कार्यक्रम आयोजित रविवारी आयोजीत केला होता.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, भाजपचे जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेवक अमर पाटील, माजी नगरसेविका प्रमीला पाटील, मोनिका महानवर, सहकारचे सेलचे जिल्हा संयोजक अशोक मोटे, भटके विमुक्त आघाडीचे जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे, मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, उपाध्यक्ष सुनील देबेरे, युवा नेता अमर ठाकूर, जमीर शेख, युवा मोर्चाचे अध्यक्ष गौरव नाईक, प्रभाग अध्यक्ष चितरंजन शेट्टी, प्रकाश शेलार, रामा माहनवर, घनश्याम शर्मा. उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्षा मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, महादु महानवर, अभिषेक पटवर्धन, देवांशु प्रभाळे, दिपेश पर, आबा गुटूगडे यांच्यासह पदाधिकारी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीतील दिलीपकुमार जाधव यांना श्रद्धांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, मुंबई पोर्ट ट्रस्ट कामगारांचे कुशल नेते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे विश्वासू अंगरक्षक अमित जाधव यांचे वडील दिलीपकुमार देऊ जाधव यांचे नुकतेच निधन झाले. धम्मानुसार त्यांचा पुण्यानुमोदन आणि शोकसभेचा कार्यक्रम झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अनेकांनी दिवंगत दिलीपकुमार जाधव यांना श्रद्धांजली वाहिली.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष जी.बी. कदम होते. बौद्धाचार्य सुगंध भिवा कदम यांच्या हस्ते बुद्धवंदना घेण्यात आली. या वेळी चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समिती, शाखा क्रमांक २, करंबवणे विभाग, कापरे गट क्र. ०८, माता रमाई महिला मंडळ करंबवणे, बौद्ध विकास मंडळ करंबवणे मुंबई, अजिंक्य क्रिकेट क्लब करंबवणे व बौद्धजन पंचायत समिती, शाखा क्रमांक ७२८ सलग्न माता रमाई महिला मंडळ, तरुण युवा मंडळ, नवीन पनवेल. या मंडळांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच माजी नगरसेवक संतोष शेट्टी, युवा नेते किशोर चौतमोल आदी भाजपचे अनेक कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.

# आदिवासी भगिनींना भाऊबीज भेट; फराळाचे वाटप

**कळंबोली, उरण : वार्ताहर**

आदिवासी भगिनींची दिवाळी आनंददायी व्हावी यासाठी कोकण कट्टा, विलेपार्ले आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी (पनवेल) या सामाजिक संस्था आदिवासी भगिनींकडून ओवाळणी करून घेत त्यांना साडी-चोळी आणि दिवाळीचे फराळ भेट देवून भाऊबीज साजरी करतात. यावर्षीही हा उपक्रम राबविण्यात आला.



भाउबिजेच्या निमित्ताने पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत दुश्मि-खारपाडा हद्दीतील स्वयंभू शिव मंदिर ठाकूरपाडा येथे कोकण कट्टा आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी भगिनींसाठी साडी चोळी व फराळ भेट देण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम या दोन्ही संस्था राबवित असून कार्यक्रमात २५० भगिनींना भाऊबीज भेट देण्यात आली.

या वेळी कोकण कट्टाचे संस्थापक अध्यक्ष अजित पितळे, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संतोष ठाकूर, सुनील वनकुद्रे, जगन्नाथ गावडे, सुजित कदम, हेमंत सावंत, विजय खोपे, चेतन जळगावकर, प्रथमेश पवार, विजय बाईत, दत्ता सोनपावले, राजू पाटील, मानसीताई पाटील, सचिन पाटील, स्मिता रसाळ, शैलेश कोंडसकर, प्रा.जयेश शिंदे आदी उपस्थित होते.

## निवडक

### तांब्याच्या तारा, पट्ट्यांची चोरी

**पनवेल :** तळोजा परिसरात असलेल्या एका कंपनीच्या मालकाकडून ४० किलो वजनाच्या तांब्याच्या भंगारातील तारा आणि पट्ट्यांची चोरी झाल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रीत पगारिया यांनी एमएमटीडी इंजिनियरिंग प्रा ली कंपनी खरेदी केली. येथे ४३ कामगार काम करतात. त्यातील मोईन बेग या कामगाराने काठीने सीसीटीव्ही कॅमेरा तोडत असल्याचे दिसून आले आहे. त्याबाबत अधिक चौकशी केली असता येथील इन्चार्ज प्रकाश पांडे याने सीसीटीव्ही कॅमेरा तोडून टाक आणि आणि कॅमेरा तोडल्यानंतर तांब्याच्या तारा आणि पट्ट्या असलेल्या दोन गोण्या कंपनीच्या गेटजवळ नेऊन ठेवण्यास सांगितले.

### 'रोटरी'तर्फे दिवाळी फराळ वाटप

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनतर्फे स्वप्नालय बालगृह मुलींचे वसतीगृह येथे दिवाळी फराळ वाटप करण्यात आले. या वेळी क्लबचे अध्यक्ष चारुदत्त भगत, सचिव तुषार तटकरी, विजय मेढेकर, इनव्हील क्लब अध्यक्षा शुभदा भगत आदी उपस्थित होते. दरम्यान, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. गरीब व गरजू नागरिकांना रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनतर्फे आवर्जुन मदत करीत असतात.



# पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी घाडगे

**पनवेल : वार्ताहर**

नुकताच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात परिमंडळ १ व परिमंडळ २ मधील वपोनि तसेच पोनि अधिकारी वर्गाच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्या बदल्यांच्या अनुषंगाने आज अनेक नवीन अधिकाऱ्यांनी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात आपला पदभार स्वीकारला आहे.



त्यामध्ये पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या वपोनि पदी गजानन घाडगे तर पो. नि.पदी आनंद कांबळे, खारघर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शितल पाटील, खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी सचिन परदेशी, कोपर खैरणे पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी नरेंद्र डंबाळे, तळोजा पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी सागर निकम, नेरूळ पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी पंकज घाडगे, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी अभिजीत अभंग, तुर्भे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी सतीश चाबुकस्वार, नेरुळ पोलीस ठाण्याच्या पो. नि.पदी संजय लाड, रबाळे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी श्याम बनसोडे, सीबीडी पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी संजय परदेशी, उरण पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शरद जाधव, एनआरआय पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी मनोहर पगार, वाहतूक शाखा पो. नि.पदी मोहनी लोखंडे, वाशी पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी जहांगीर मुलाणी, विशेष शाखा पो.नि.पदी कल्पना किरण जाधव-बत्तासे, रबाळे पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी संजय वेदपाठक, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी शाकीर मुसा पटेल, कळंबोली पोलीस ठाण्याच्या पो.नि.पदी अयाज युसूफ पटेल यांची नेमणूक नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी केली आहे.

# पत्रकारांसोबत दिवाळी फराळ

**उरण : रामप्रहर वृत्त**

पत्रकारांनी समजहितासाठी काम करून समाजात आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे पत्रकारांप्रति आदर, प्रेम बाळगत व एक कुटुंब म्हणून म्हात्रे कुटुंबातर्फे दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा खजिनदार प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी सांगितले.

समाजामध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या घडामोडी शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी २४ तास निःस्वार्थीपणे काम करणारा पत्रकार हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. उरण, पनवेल, रायगड जिल्ह्यासह नवी मुंबईमधील पत्रकार योग्यतेने काम करत आहेत. त्याअनुषंगाने कोपर गाव येथे पत्रकारांसाठी दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रीतम म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी पत्रकारांच्या कार्याबाबत समाधान व्यक्त करत उपस्थित सर्व पत्रकारांचे स्वागत केले. या वेळी जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते नारायण घरत यांनीही पत्रकारांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारांचे प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, ज्येष्ठ पत्रकार मंदार दोंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी एका चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे सांगत जे.एम. म्हात्रे, प्रीतम म्हात्रे यांचे आभार मानले. या वेळी सर्व पत्रकारांनी म्हात्रे कुटुंबीयांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

**खारघर : प्रभाग ४मधील सेक्टर १३ येथे महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रचार केला.**



# आदिवासी पाड्यावर दीपोत्सव साजरा

**पनवेल : वार्ताहर**

माणुसकीच्या दृष्टिकोनातून संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून करंजाडे येथील मोकरी आदिवासी वाडीवर सामाजिक दिवाळी साजरी केली. त्यांनी या माध्यमातून खर्या अर्थाने बांधिलकी जपत आदर्श वस्तूपाठ ठेवला. दीपोत्सवाने हा पाडा खर्या अर्थाने प्रकाशात न्हावून गेला.

संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी विमानतळापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या करंजाडे येथील मोकरी आदिवासी वाडीवर दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गुरुवारी येथील १५० कुटुंबांना फराळ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर त्यांना रवा, मैदा आणि वनस्पती तूप देण्यात आले. मुलांसाठी बिस्किटसुद्धा नेण्यात आले होते. या वेळी करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, पल्लवी एरंडे, छाया भोसले, साक्षी, अर्चना, नाथाभाई धारवाड, राज इंगळे, संकल्प जगदाळे आदी उपस्थित होते.

संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून शेकडो दिवे मोकरी आदिवासीवाडीवर लावण्यात आले. शुभ दीपावली असा संदेश देत हा परिसर पूर्णपणे तेजोमय करण्यात आला. त्याचबरोबर या वाडीवर आकाश कंदील लावून आनंद अधिक उजळून निघाला. अनेक वर्षांपासून आम्ही या ठिकाणी वास्तव्यास आहे, परंतु यंदा दीपावलीचा सण साजरा करता आला, अशी प्रतिक्रिया येथील रहिवाशांनी दिली.

## संपादकीय

# अमेरिकेचा कौल कुणाला?

अवघ्या जगाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीसाठीचे मतदान आज ५ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. अमेरिकेत भारतीय मतदार मोठ्या संख्येने असून मागील दोन निवडणुकांमध्ये त्यांचे मतदानाचे प्रमाण उत्तम व अमेरिकेतील मतदानाच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे.

**अमेरिकेच्या निवडणुकांमध्ये ज्या काही घडामोडी घडतील त्याचा संपूर्ण जगावर परिणाम होत असतो असे राजकारणाचा अभ्यास असणारे जगभरातले जाणकार मानतात. अमेरिकेच्या सरकारची भारताविषयीची नेमकी भूमिका काय हे भारताच्याही दृष्टीने कायमच महत्त्वाचे राहिले आहे. अशातऱ्हेने अवघ्या जगाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठीचे मतदान (आज) मंगळवार, ५ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीत एकीकडे रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प आहेत. त्यांनी अध्यक्षीय निवडणुकीत यापूर्वी एकदा विजय आणि एकदा पराभव पाहिला आहे. ते आता पुन्हा ही निवडणूक लढवित आहेत. दुसरीकडे डेमोक्रॅटिक पक्षाने आधी या निवडणुकीत विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना उमेदवारी दिली होती, परंतु त्यांच्या आरोग्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्याने त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. मग या पक्षाकडून भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांना उमेदवारी देण्यात आली. अमेरिकेतील ५० राज्यांमध्ये एकूण ५३८ इलेक्टोरल कॉलेज वोट आहेत. राष्ट्राध्यक्ष बनण्यासाठी कोणत्याही उमेदवाराला बहुमताचा २७० किंवा अधिक हा आकडा पार करावा लागतो. गेल्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टीच्या जो बायडन यांनी ३०६ इलेक्टोरल मते मिळवली होती तर रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांना २३२ मते मिळाली होती. अमेरिकेत स्थायिक होऊन मताधिकार मिळालेले भारतीय एकेकाळी डेमोक्रॅट पक्षाला एक गठ्ठा मतदान करीत, पण भारतात मोदींचा उदय झाल्यानंतर, त्यांची धोरणे तसेच अमेरिकेतील राजवटीशी त्यांचे असलेले सलोख्याचे संबंध यामुळे आता भारतीय मतदार मोठ्या प्रमाणात रिपब्लिकन पक्षाकडे वळले आहेत असे म्हटले जाते. पुढची चार वर्षे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प आणि भारतात पंतप्रधानपदी मोदी असे समीकरण जुळून आल्यास दोन्ही देशांतील परस्पर सहकार्य आगळी उंची गाठेल असे आता अमेरिकेतील भारतीयांना वाटते. संपूर्ण अमेरिकेचा विचार करता मात्र मूळ भारतीय वंशाच्या अमेरिकन नागरिकांची संख्या एक टक्क्यापेक्षाही कमी आहे. यातील अनेकांना ट्रम्प प्रशासनाचे यापूर्वीचे एच१बी व्हिसाविषयीचे धोरण पसंत नव्हते. या धोरणाचा भारतातून अमेरिकेत नोकरीसाठी जाऊ पाहणाऱ्या तसेच अमेरिकेचे नागरिकत्व मिळवू इच्छिणाऱ्यांना अधिक त्रास होतो, पण अमेरिकेचे नागरिकत्व मिळून मताधिकारही मिळालेल्या नागरिकांना त्याचा तसा काही त्रास नाही. त्यामुळे अमेरिकेतील बहुसंख्य गोऱ्यांप्रमाणेच हे नागरिकत्व मिळालेले भारतीयही आता ट्रम्प यांना पाठिंबा देत आहेत. ट्रम्प यांनी भारताच्या अंतर्गत प्रश्नांबाबत कधीही भारतविरोधी भूमिका घेतली नाही हे याचे मुख्य कारण आहे. चीनच्या बाबतीत अमेरिकेने भारताला साथ द्यावी ही तेथील भारतीयांची मोठी मागणी आहे. भारताच्या अंतर्गत प्रश्नांच्या बाबतीत डेमोक्रॅटिक पक्षाने मात्र अनेकदा भारताच्या माथी दोष मारण्याचा प्रयत्न केला असून यंदाच्या निवडणुकीतील या पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्यावर त्या मुस्लिमधार्जिण्या असल्याची टीका होते. अर्थात डेमोक्रॅटिक पक्ष हॅरिस जिंकल्यास भारत–अमेरिका सहकार्य अधिक वाढेल असेच म्हणत आला आहे. बहुमत यापैकी कोणत्या पक्षाच्या पारड्यात पडेल हे याच आठवड्यात स्पष्ट होणार आहे.**

# माणगावात ठिकठिकाणी मतदानाचा जागर

## भुवन आदिवासीवाडी, उणेगाव, भादाव, कशेणे शाळेकडून प्रभातफेरी

**माणगाव : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीमध्ये सर्व मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून निर्भयपणे मतदान करावे, यासाठी तालुक्यात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. राजिप शाळा भुवन आदिवासीवाडी, उणेगाव, भादाव, कशेणे शाळेतर्फे मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला. या वेळी सकाळी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली.

या रॅलीत १०० टक्के मतदान करण्यासंबंधी घोषणा देण्यात आल्या. पालक, तरुणांनी या रॅलीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. मतदान जनजागृती होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या





चित्रकला, रंगभरण स्पर्धा घेऊन बक्षिसे देण्यात आली, तसेच पालकांकडून मतदान करण्यासंबंधीचे संकल्पपत्र भरून घेऊन संदेशकार्डही देण्यात आले. कशेणे शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीतील काही विद्यार्थ्यांनी एक छोटीशी नाटिका सादर केली, तसेच शासनामार्फत प्राप्त संकल्पपत्र विद्यार्थ्यांमार्फत पालकांपर्यंत पोहचविण्यात आले.

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... उठा उठा निवडणूक आली, मतदान करण्याची वेळ झाली...हम सब की एक पुकार, मतदान हमारा अधिकार...नाही विकला जाणार, निर्भय होऊन मतदान करणार... अशा घोषणा देत संपूर्ण गावातून फेरी काढून जनजागृती करण्यात आली. सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्पपत्र भरून दिले. गावातील मतदारबंधू आणि भगिनींनी सदर जनजागृती फेरीस उदंड प्रतिसाद दिला. येत्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवून योग्य उमेदवार निवडून देऊ, असे आश्वासन दिले.

कार्यक्रमासाठी भुवन आदिवासीवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश जगताप, उपाध्यक्षा सुनिता वाघमारे, सदस्या पारु जगताप, मुख्याध्यापक हेमंत बारटक्के, उपशिक्षक किशोर तायडे, अंगणवाडीसेविका नेहा शिर्के, मुख्याध्यापक श्रीकांत गावडे, शिक्षक सुर्यभान शिरसाट, उपशिक्षक मुकेश भोस्तेकर आणि अमोल हांगे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अनिता डवले, प्रकाश उभारे, उपशिक्षिका समिता महाडिक, सतीश तळकर, चंद्रकला गोसावी उपस्थित होते.

# भंगार डेपोमुळे चोरीचे प्रमाण वाढले

**चौक : प्रतिनिधी**

जागोजागी भंगार गोळा करण्याचे डेपो वाढत चालले आहेत. त्यामुळे किरकोळ चोरीचे प्रमाणदेखील वाढत चालले आहे. याबाबत संबंधित प्रशासनाने त्वरीत योग्य ती कारवाई करण्याची मागणी होत आहे.



जुना–मुंबई पुणे रस्ता तसेच परिसरातील गावांत अनधिकृत जागा बळकावून त्यावर डेपो तयार होत आहेत. सायकल, रिक्षाच्या माध्यमातून भंगार गोळा होत आहे. त्यातच परिसरातील काही जण भंगार गोळा करून डेपोवर जाऊन विकत आहेत. लोखंड, पत्रा, प्लास्टिक घराच्या आसपास किंवा मोकळ्या जागेत ठेवले जाते. हेच सामान सध्या चोरीला जात आहे.

फार्महाऊस, धनिकांचे बंगले येथे तारा, विद्युत साहित्य, पाणी पुरवठा साहित्य, पाईप व अन्य सामान नोकरांच्या विश्वासावर ठेवले जाते, मात्र या सामानाची चोरी झाल्याचे मालकांना कालांतराने समजते आहे.

ज्या ठिकाणी लोखंडाचे काम सुरू असते तिथे लहान मुले फिरून तुकडे गोळा करतात किंवा ते चोरी करण्याचा प्रयत्न करतात. अनेक फार्महाऊस व बंगलेधारकांच्या कुंपणाला असणाऱ्या तारा गायब होत आहेत.

पोलिसांनी यावर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी होताना दिसत आहे.

# राज्यात महायुती पूर्ण ताकदीनिशी रिंगणात –खासदार सुनील तटकरे



**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात महायुती एकसंघपणाने लढत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून कोणीही बंडखोरी केलेली नाही. राज्यातही महायुती पूर्ण ताकदीनिशी निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. संपूर्ण राज्यात महायुती एकसंघपणाने लढत आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर महायुतीचीच सत्ता येईल, असा विश्वास महाराष्ट्र राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी माणगाव येथे दिवाळी शुभेच्छा कार्यक्रमात कार्यकर्त्यांना दिला.

राज्यातील महायुतीचे २८८ विधानसभा मतदारसंघातून उमेदवार निवडणूक लढवित असल्यलाचेही त्यांनी सांगितले. माणगाव शहराला विकासात्मक कामे करताना काहीही कमी पडू दिले जाणार नाही. माणगावचा विकास महायुतीनेच केला आहे. अन्य कोणीही केलेला नाही. उर्वरित सर्व विकासकामे लवकरच पूर्ण होणार आहेत. माणगाव शहरातील नगरपंचायत इमारत, नळपाणी पुरवठा योजना, नाट्यगृह ही कामे लवकरच पूर्ण केली जातील. भादाव येथील पुल, बंधारा, नाना–नानी पार्क या विकासकामांना लवकरच मंजुरी मिळणार आहे, तसेच द. ग. तटकरे महाविद्यालय, मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाची शाळा, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय आणि श्रीमती विठाबाई मारुती गोगावले नर्सिंग कॉलेज या शैक्षणिक शाखांना सर्वोतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन खासदार सुनील तटकरे यांनी दिले, मात्र कार्यकर्त्यांनी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघात जागृत राहून काम करावे, असे आवाहन केले.

सुरुवातीला सुनील तटकरे यांनी शिवसेना पक्षप्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, शिवसेना तालुकाप्रमुख महेंद्र मानकर, माजी नगराध्यक्ष आनंद यादव यांच्याशी चर्चा केली. या वेळी सर्व नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

# रोह्यातील नेत्र तपासणी शिबिरात २२ रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**धाटाव : प्रतिनिधी**

श्री धावीर देवस्थान भक्तनिवासात झालेल्या मोतीबिंदू तपासणी शिबिरात सोमवारी (दि. ४) १०० नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २२ रुग्णांना आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.



रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट सातत्याने 'अंधत्वाकडून दृष्टीकडे' हे मोतीबिंदूमुक्त रोहा अभियान राबवत आहे. या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटपदेखील करण्यात आले. शंकरा आय. हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील व सहकाऱ्यांनी रुग्णांची तपासणी केली. रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, इलियास डबीर, संतोष खटावकर, दिनेश जाधव, दिनेश मोहिते, उस्मान रोहेकर, अहमद दर्जी, राजेश काफरे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, परशुराम चव्हाण, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, बिलाल मोरबेकर आदींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

**रायगडची पहिली संशोधक विद्यार्थिनी**

# तृणाली शाह हिची 'नासा'मध्ये निवड



**माणगाव : प्रतिनिधी**


शहरातील विकास कॉलनी येथील तृणाली अनिल शाह या तरुणीची ज्युनिअर शास्त्रज्ञ म्हणून अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन (नासा) या अंतराळ संशोधन संस्थेमध्ये नुकतीच निवड करण्यात आली आहे.

जागतिक पातळीवर निवड झाल्याने तिचा अशोकदादा साबळे प्रतिष्ठानतर्फे अ‍ॅड. राजीव साबळे यांनी माणगाव भूषण पुरस्कार देऊन गौरव केला. लवकरच ती जपान येथे प्रशिक्षणासाठी प्रयाण करणार आहे. अशाप्रकारे नासामध्ये निवड होणारी तृणाली ही रायगड जिल्ह्यातील पहिली आणि महाराष्ट्रातील दुसरी तरुण संशोधक ठरली आहे. तृणालीची नासामध्ये निवड झाल्याबद्दल उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा यांनी तिचे विशेष अभिनंदन केले.

तृणाली शाह जपान येथील नागोया विद्यापीठात गेस्ट रिसर्चर म्हणून ५ महिने संशोधक म्हणून काम करणार आहे. त्यानंतर ती अमेरिकेतील नासाच्या मुख्य संशोधन केंद्रातील कार्यालयात हजर होणार आहे.




**अलिबाग : दिवाली विथ माय भारत या उपक्रमांतर्गत नेहरू युवा केंद्र व प्रिझम सामाजिक विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने धसाडे कुणे व उसर येथील आजूबाजूच्या परिसराची जिल्हा युवा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी नंदकुमार गोंधळी यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत पोलीस पाटील शशिकला धसाडे, स्वराज्य ग्रामसंघ खजिनदार जिया जयेश धसाडे यांसह स्थानिक महिला, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या युवती सहभागी झाल्या होत्या.**



# नेरळपाड्यात बलिप्रतिपदेनिमित्त बैलांची मिरवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील पाडा भागात बैलगाडा शर्यतप्रेमी म्हणून भगवान चंचे आणि दत्ता चंचे यांची ओळख आहे. त्यात पाडा हे गाव नेरळ गावातील सर्वांत जुनी वस्ती म्हणून ओळखले जाते. या पाडा गावातील रहिवाशांकडे बैलपोळा, दिवाळी पाडवा आणि बलिप्रतिपदा हे सण येथील शेतकरी आनंदाने साजरा करतात.

गावातील सर्व शेतकरी आपल्या बैल, गायी, म्हशींना अंघोळ घालून त्यांना सजवतात. त्याच वेळी रंगबेरंगी फुलांनी सजवून ठेवल्यावर त्यांची पूजा–अर्चा केली जाते. त्यानंतर गावातील वेशीवर माथेरान नेरळ–कळंब रस्त्यावर गवताच्या मोळ्या पेटवून त्यावरून बैलांना उडवत नेवून बैल उडवण्याची प्रथा जपली जाते. पाडा गावातील ग्रामस्थ भगवान चंचे हे बैलगाडा शर्यती मधील मोठे नाव असून त्यांच्याकडे दहापेक्षा जास्त वेगवेगळ्या जातीचे बैल आहेत.

दिवाळी पाडव्याच्या दिवशी त्या बैलांना सजवून ठेवण्यात आले होते. दुपारी पाडा येथील मिनीट्रेन फाटकातून बैल उडवण्यासाठी सर्व शेतकरी आपल्या बैलांना घेऊन निघाले. सोबतीला ढोल–ताशे होते आणि ही मिरवणूक मध्य रेल्वेचे गेट उलटून गेल्यावर मातोश्री नगर येथून पुन्हा ते सजवलेले बैल आपल्या गोठ्याकडे आणण्यात आले.

या वेळी सजवलेले आणि रंगीबेरंगी साहित्याने सजवलेले बैल रस्त्याने वाहतूक करणाऱ्या नेरळ बाहेरील पाहुण्यांचे आकर्षण ठरले. नेरळ पाडा गावातील ही प्रथा आता ज्येष्ठ लोकांच्या सोबत तरुण मंडळी यांनी हातात घेतल्याने तरुण वर्गाचा उत्साह त्या ठिकाणी दिसून येत होता.

# लोकनेते अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ आणि अशोकदादा साबळे स्मृती प्रतिष्ठानतर्फे स्व. माजी आमदार अशोकदादा साबळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ यावर्षीही माणगाव भूषण पुरस्कार देऊन सहा गुणवंतांना दिप संध्या या कार्यक्रमात गौरविण्यात आले.

यामध्ये डॉ. गौतम राऊत वैद्यकीय सेवा, चिमणलाल मेरा शिक्षण, संतोष खाडे कोरोना समाजसेवा, ओम सुर्वे क्रीडा, रजनी मढवी कोरोना समाजसेवा, तृणाली शाह अंतराळ संशोधन, पुजा सोंडकर संगीत यांना माणगाव भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व गुणवंतांनी कृतज्ञता व्यक्त केली.

या वेळी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. राजीव साबळे, खरवली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र मानकर, नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, नगरसेवक सचिन बोंबले, कार्यकारी अधिकारी संतोष माळी, सेक्रेटरी कृष्णा भाई गांधी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरुण क्षिरसागर, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, ड. विनोद घायाळ, नगरसेवक सुनील पवार, विरेश येरुणकर धनाजी जाधव, मनिषा मोरे, निशिगंधा मयेकर, दिलीप उभारे आदी उपस्थित होते. सर्व पुरस्कारकर्त्यांचे मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले.



# शहाबाज येथील भैरवनाथ मंदिरात दीपोत्सव

## हजारो दिव्यांच्या प्रकाशात उजळला परिसर

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील शहाबाज येथील भैरवनाथ मंदिरात शनिवारी (दि.२) दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने मंदिरात दीपोत्सव साजरा करण्यात आला. मंदिर आणि परिसरात एक हजार १११ दिवे प्रज्वलित करण्यात आले. या दिव्यांच्या प्रकाशात मंदिर आणि मंदिराचा परिसर न्हाऊन निघाला.

शिवभैरव भजन मंडळ गेली नऊ वर्षे हा उपक्रम राबवत आहे. मंदिर परिसरात दिव्यांची आरास करण्यात आली होती. या वेळी फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली. या रोषणाईचे समोरच्या तलावात पडणारे प्रतिबिंब त्याचे सौंदर्य अधिकच खुलवत होते.

डोळ्यांचे पारणे फेडणारा हा दीपोत्सव अनुभवण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. गावातील मंडळाच्या कार्यकर्त्यांनी यात मोलाचे योगदान दिले.

**जोडपत्र ४७**
**प्रपत्रे क– १ ते सी ८ आणि क / सीएअ**
**प्रपत्र क – १**

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शनवर प्रसिद्ध करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता : प्रशांत रामशेठ ठाकूर,
श्री सदन, प्लॉट नं. ५८ ए, मिडलक्लास को. ऑ. हौ. सोसायटी, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ .

राजकीय पक्षाचे नाव : भारतीय जनता पार्टी :
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

निवडणूकीचे नाव : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

मतदारसंघाचे नाव : १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघ

मी, प्रशांत रामशेठ ठाकूर (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रवद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :–

(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|
| १ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 3833/2023 सीबीडी, बेलापूर, पोलीस स्टेशन FIR No-CR No. 101/2022 FIR Date - 24/06/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही .<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भारतीय दंड संहिता कलम १४३, १४५, १८८, ३४१ महाराष्ट्र पो. का. क ३७ (१) (३), १३५, ३३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कृती समितीचे नमुद प्रमुख कार्यकर्ते व इतर २००० ते २५०० यांनी त्यांचे आंदोलनास परवानगी नाकारली असताना देखील तसेच कोणत्याही प्रकारची लाऊड स्पिकर परवानगी नसताना त्यांना एकत्र जमू नये असे कळविले असतानाही त्यांनी बेकायदेशीर जमाव जमवून रस्त्यावर स्टेज घालून वाहतुकीस अडथळा निर्माण केला व मा. पो. आयुक्त नवी मुंबई यांच्याकडील पोआ / नमुं / विशा / मआ ३१३८ / २०२२ दि. १३/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| २ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 38/2023 उरण, पोलीस स्टेशन, उरण, जि. रायगड FIR No-CR No. 55/2022 FIR Date - 17/03/2022 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भा. दं.वि कलम ३४१, १८८ सह म. पो. का. कलम ३७ (१) (३)/१३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दास्तान फाटा जासई, ता. उरण, जि. रायगड या ठिकाणी एकत्र येवून सिडको प्रशासनाचा निषेध करून समितीच्या पदाधिकारी यांनी जमलेल्या समुदायास संबोदित करून त्यांच्या मागण्यांसाठी १० ते १५ मिनिटे रस्ता रोको आंदोलन करून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला. तसेच मा. पोलिस आयुक्त सो, नवी मुंबई यांचेकडील<br>१) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश /१२१३ /२०२२ दि. ४/ ३ / २०२२ रोजीचे फौजदारी प्रक्रीया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) पोलीस आयुक्त यांचे कार्यालय अन्वये<br>२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जा.क्र. पोआ/नमुं/ वि.शा./म. आ/ १३८७/२०२२, दि. १५/०३/२०२२ प्रमाणे निर्गमित आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ३ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3618/2022 पनवेल शहर पोलीस स्टेशन, पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 32/2022 FIR Date - 13/01/2022 | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.<br>याप्रकरणातील लागू कायद्याची कलमे पुढीलप्रमाणे :–<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७० सह साथरोग अधिनियम १८९७ कलम ३ सह म. कोविड १९ विनियमन २०२० कलम ११ सह अधिनियम महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समिती तसेच २१ गाव प्रकल्पबाधित कृती समिती यांच्यावतीने दिवंगत लोकनेते दि. वा. पाटील यांचे जयंतीनिमित्त नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ गाभा क्षेत्र, भराव कोल्ही – कोपर याठिकाणी भुमीपुत्र परिषद कार्यक्रमाचे विनापरवाना आयोजन करून अंदाजे ६०० ते ७०० जनसमुदाय जमवून उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लघंन करून सदर कार्यक्रमाची परवानगी न घेता मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या विरोधात सरकारतर्फे फिर्याद आहे. |
| ४ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3204/2022 तळोजा पोलीस स्टेशन, तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 252/2021 FIR Date - 25/08/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही .<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९,२७०,<br>सह साथ रोग अधिनियम १९५१ चे कलम ३<br>सह राष्ट्रीय आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ व<br>तसेच महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, कोरोना काळामध्ये कोणतीही परवानगी न घेता इतर लोकांसह काम बंद आंदोलन करण्याचा प्रयत्न |
| ५ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, उरण | SCC. No. 145/2023 उरण, पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No - CR No. 245/2021 FIR Date - 09/08/2021 | सदरचा गुन्हा नमुद न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असून आरोपीवर समन्स काढणेवर. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७० साथीचे रोग कलम ३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपींनी विना परवाना मशाल मोर्चाचे आयोजन करून ५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र करून महाराष्ट्र शासनाने कोरोना १९ संसर्गजन्य रोगाच्या अनुषंगाने लागू केलेल्या नियमांचे उल्लंघन केले. तसेच पोलीस आयुक्त नवी मुंबई यांनी जारी केलेल्या<br>जाक / पोआ/ विशा / मआ / ३५३७ / २०२१ दि. ०२/०८/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) १३५ अन्वये तसेच<br>२) जाक्र / कोरोना / मनाई आदेश / ३५३५ / २०२१ दि. ०३/०८/२०२१ अन्वये मनाई आदेशाचे उल्लंघन केले म्हणून गुन्हा |
| ६ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 6909/2023 कामोठे पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No - CR No. 325/2021 FIR Date - 26/06/2021 | न्यायप्रविष्ठ . अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८,<br>महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत आरोपीत आंदोलनकर्ते यांनी कोणतीही पूर्व परवानगी न घेता एकत्र जमून हातात सरकारी विरोधी फलक व बॅनर घेवून सरकार विरोधी घोषणा देत भाषणे करून एमजीएम हॉस्पीटल समोर पनवेल सायन रोडवर उतरून रास्ता रोको करून चक्काजाम आंदोलन केल्याने त्यांनी मा. पोलीस आयुक्त सो. नवी मुंबई यांचेकडील जा.क्र. पोआ/नमुं / विशा / म आ / २८१७ / २०२१, दि. १९/०६/२०२१ च्या मनाई आंदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ७ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, बेलापूर | SCC. No. 2924/2022 एनआरआय, पोलीस स्टेशन, सीबीडी, बेलापूर FIR No-CR No. 147/2021 FIR Date - 24/06/2021 | न्यायप्रविष्ठ अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भारतीय दंड संहिता कलम १४३, ३४१, १८८, २६९, २७० साथ रोग अधिनियम १८९७ कलम ३,<br>महाराष्ट्र कोविड १९ विनियन २०२० कलम ११,<br>म .पो. अधि. १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५, ११५ /११७<br>सार्वजनिक मालमत्ता विद्रुपिकरण कलम ३. ध्वनी प्रदुषण नियमन कायदा २००० कलम १५, १९<br>फिर्यादी यांनी पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांच्याकडील<br>१) जा . क्र . विशा/ नमुं /कामगार / सिडको घेराव/२८५७/२०२१ दि. २२/०६/२०२१ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ (१) (३) व<br>२) जा. क्र. पोआ / विशा / मआ / २८१७ / २०२१ दि. १९/०६/२०२१ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३ (१) (३) १३५ |

(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|
| | | | अन्वये तसेच<br>३) जा. क्र. कोरोना / मनाई आदेश / २६३६ / २०२१ दि.०६/०६/२०२१ अन्वये मनाई आदेश जारी असून पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात त्याची प्रसिद्धी देखील करूनही लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे आयोजक यांनी अंदाजे १८००० ते २०००० लोकांचा विनापरवाना बेकायदेशीर जमाव जमवून उपस्थित राहुन सार्व जनिक वाहतुकीस अडथळा करून रस्ता अडवून पामबिच रोडवर से . नं. नवीन ५०, सीवुड सिग्नलजवळील असलेल्या रेल्वे ओव्हर ब्रीजच्या जवळ स्टेज तयार केलेले दोन मोठे ट्रेलर आडवे उभे करून त्यावर विनापरवाना लाऊड स्पिकर लावून घोषणा देवून चिथावणीखोर भाषणे केली व प्रमुख नेते व उपस्थित जनसमुदाय यांनी सामाजिक अंतर राखले नाही, मास्क परिधान न करता कोविड नियमांचे उल्लंघन केले तसेच नवी मुंबई महानगरपालिका समोरील किल्ला सिग्नल ते एनआरआय कॉम्प्लेक्स सिग्नल पर्यंतच्या रोडच्या मध्यभागी असलेल्या वीजेचा खांब तसेच झाडावर मोठया प्रमाणावर बॅनर्स व झेंडे लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केले. तसेच सभास्थळी व परिसरात मोठया प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या प्लॅस्टीकच्या रिकाम्या वाटल्या, नाष्टयाचे रिकामे पाकीटे, कागदी पत्रावळया टाकून केरकचरा केला. तसेच सदर आंदोलनाचे विनापरवाना ड्रोनद्वारे शुटींग केले म्हणून वरील कलमान्वये सरकारतर्फे फिर्याद दिल्याने गुन्हा नोंद |
| ८ | मे. मुख्य सत्र न्यायाधिश, रायगड, अलिबाग | SCC. No. 1397/2022 उरण पोलीस स्टेशन, ता. उरण, जि. रायगड FIR No-CR No. 183/2021 FIR Date - 10/06/2021 | सदर खटला नमुद कोर्टामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२०२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे.<br>भा. दं. वि. कलम १८८, २६९, २७०<br>साथीचे रोग कलम ३<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, आरोपीत यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास नाव देण्यावावत दि. १०/०६/२०२१ रोजी लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने मानवी साखळी आंदोलन करण्यात आले होते. सदर आंदोलनाची पूर्व तयारी तसेच लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जासई गाव व उरण परिसरामध्ये मोटार सायकल रॅलीचे आयोजन करून एकत्रित जमून कोरोना रोगाचा संसर्ग व प्रादुर्भावाच्या अनुषंगाने सोशल डिस्टंसिंगचे पालन न करता लोकांची सुरक्षितता धोक्यात आणून व महाराष्ट्र शासनाचे आदेशाचे उल्लंघन केल्याने तसेच कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनेचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो, नवी मुंबई यांनी जाहिर केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| ९ | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल | SCC. No. 3990/2021 पनवेल शहर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 309/2021 FIR Date - 10/06/2021 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८, २६९, २७०,<br>सह महाराष्ट्र पोलीस अधि . सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>सह साथीरोग अधिनियम १८९७ कलम ३<br>सह आपत्ती व्यवस्थापन अधि. २००५ चे कलम ५१<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, दि. १०/०६/२०२१ रोजी सकाळी १० ते १२ वा. दरम्यान दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीचे पदाधिकारी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली १८ गाव समितीचे सदस्य असे एकूण सुमारे १५०० कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी पनवेल शहर पोलीस ठाणाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते ठाणा नाका, वडघर ते बंबावीपाडा मेन रोडवर व कोल्ही कोपर येथील दत्त मंदीरासमोर नियोजित विमानतळाच्या जागेवर मोकळया मैदानात एकत्र येवून सामाजिक अंतराचे पालन न करता नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता धोक्यात आणून कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाच्यावतीने जारी करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांचे पालन न केल्याने तसेच मा. पोलीस आयुक्त सो., नवी मुंबई यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा |
| १० | मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पनवेल कोर्टाच्या वेबसाईटवरती या गुन्ह्याची माहिती मिळत नाही. संबंधित न्यायालयाकडून कोणतेही समन्स प्राप्त नाही. खारघर पोलीस स्टेशन यांच्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे मा. न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात कोर्ट केस नं. एम.ए.नं. २८१/२०१३ दाखल आहे. | खारघर पोलीस स्टेशन, ता. पनवेल, जि. रायगड FIR No-CR No. 72/2010 FIR Date - 27/09/2010 | न्यायप्रविष्ठ. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही.<br>भा. दं. वि. सं. कलम १८८,<br>सह महाराष्ट्र पोलीस अधि. सन १९५१ चे कलम ३७ (१) (३), १३५<br>पोलीस स्टेशनचे हद्दीत, यातील अटक आरोपी यांनी व पळून गेलेल्या आरोपी यांनी वेकायदेशीर जमाव जमवून शाळेची फी वाढी संदर्भात आंदोलन करून मा. पोलीस आयुक्त कायदा कलम ३७ (१,३), १३५ या मनाई आदेशाचा तसेच पोलीसांनी दिलेल्या लेखी आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा. |

| (ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : –**

१. उमेदवारांविरूद्धच्या प्रलंवित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजूकर किमान १२ या टंक (फॉंट) आकारात प्रसिद्ध केला जाईल.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र ओळींमध्ये स्वतंत्रपणे तपशील देण्यात यावा.
४. जर उमेदवार विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढवत असेल तर त्याने / तिने पक्षाला त्याच्या / तिच्या विरूद्ध प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबत कळवणे आवश्यक आहे.
५ . उमेदवार अशा प्रसिद्धीनंतर तात्काळ फौजदारी खटल्यांबाबत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धतीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवेल. याशिवाय, तो निवडणूकीचा निकाल घोषीत झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र सी–४ मध्ये प्रकरणांच्याबाबतीत प्रतिज्ञापत्राच्या प्रसिद्धीबाबतचा अहवाल सादर करील.
(अ) लोकसभा व विधानसभा निवडणुकींच्याबाबतीत, हे संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल.
(ब) राज्यसभा व राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत, हे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर केले जाईल. हे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिनांकाच्या दुसऱ्या दिवसापासून आणि मतदानाच्या दिनांकापूर्वी दोन दिवस अगोदरपर्यंत वृत्तपत्र व दूरदर्शनवर प्रसिद्ध केले जाऊ शकते.

# दिवाळीतही स्वच्छतेला प्राधान्य





## एकाच रात्रीत ३१ टन १०० किलो कचरा गोळा

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळी सणात नागरिक विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असल्याने बाजारपेठा व दुकाने गजबजून गेलेली असतात, त्यामुळे कचऱ्याच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे दिसून येते. या अनुषंगाने स्वच्छ, पर्यावरणपूरक, प्लास्टिकमुक्त दिवाळी साजरी करण्याचे दिवाळीपूर्वीच आवाहन करणाऱ्या महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीच्या मध्यरात्री पहाटेपर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विशेष स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले.

नवी मुंबईकर नागरिकांप्रमाणेच नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांच्याकडूनही या मोहिमेची विशेष दखल घेत प्रशंसा करण्यात आली आहे. तब्बल ४०० स्वच्छता मित्रांनी ३१ टन १०० किलो कचरा गोळा करून शहर स्वच्छ केले.

दिवाळीच्या दिवसात मोठ्या प्रमाणात फटाकेही वाजविले जात असल्याने रस्त्यावरील कचऱ्यात नेहमीपेक्षा अधिक भर पडल्याचे निदर्शनास येते. यादृष्टीने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाके वाजविण्याचे प्रमाण जास्त असल्याने नमुंमपा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली, लक्ष्मीपूजनाच्या रात्री नवी मुंबई महानगरपालिका परिसरात बेलापूर ते दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत अतिरिक्त आयुक्त सुनील पवार तसेच व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ उपायुक्त संतोष वारुळे यांच्या नियंत्रणाखाली, १ नोव्हेंबर रोजी रात्री ११ पासून २ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजेपर्यंत स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या विशेष स्वच्छता मोहीमेकरिता आठही विभाग कार्यालय क्षेत्रात ४०० हून अधिक सफाईमित्रांची व पर्यवेक्षकांची विशेष नेमणूक करण्यात आली होती. १२ रिफ्युज कॉम्पॅक्टर वाहने आणि १५ मिनी टिपर वहाने यांच्या माध्यमातून स्वच्छता मोहीमेत गोळा करण्यात आलेला प्रामुख्याने फटाक्यांच्या कचऱ्यासह इतर कचरा तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी शास्त्रोक्त प्रक्रियेसाठी त्वरित वाहून नेण्याच्या नियोजनाची पद्धतशीर अंमलबजावणी करण्यात आली.

नवी मुंबई शहरात आठही विभागांमधील मुख्य रस्ते, मुख्य चौक, वर्दळीची ठिकाणे, बाजारपेठा अशा नागरिकांची गजबज असलेल्या स्थळांवर तसेच फटाके वाजवतात अशा मोकळ्या ठिकाणी रात्री ११ ते पहाटे ४ या कालावधीत राबविलेल्या या विशेष साफसफाई मोहीमेमध्ये हार, फुले, खाद्यपदार्थ यांचा १० टन ५०० किलो ओला कचरा तसेच विशेषत्वाने फटाके, कागद, पुठ्ठे, कापड यांचा २० टन ६०० किलो सुका कचरा गोळा करून एकुण ३१ टन १०० किलो कचरा स्वतंत्र वाहनांमध्ये तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला.

नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतच्या कालावधीत सकाळी दिवस उजाडण्याच्या आत ही विशेष साफसफाई मोहीम राबविल्याने सकाळी मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांनी स्वच्छ रस्ते, चौक व जागा पाहून महापालिकेच्या 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' या संदेशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता मोहीमेची प्रशंसा केली. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनीही महापालिकेच्या या विशेष दिवाळी स्वच्छता मोहिमेची दखल घेतली.

**नागरिकांकडून समाधान व्यक्त**

मध्यरात्री व पहाटेपर्यंत ही विशेष स्वच्छता मोहीम नियोजनबद्ध रितीने राबविण्यात आली असली तरी दररोज सकाळी होत असलेली साफसफाई नेहमीप्रमाणेच सुरू असल्याने नागरिकांनी कौतुक करीत समाधान व्यक्त केले.

# वनवासी कल्याण आश्रमातर्फे वाड्यांवर मिठाई, कपडे वाटप

**उरण : बातमीदार**

सालाबादप्रमाणे वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका वतीने हिंदूंचा महत्त्वाचा सण असलेल्या दिपावलीनिमित्त मिठाईवाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कोप्रोली वाडी, विंधने वाडी, कांठवली वाडी, जांभूळपाडा, वेश्वी वाडी, अशा पाच वाड्यावर मिठाई वाटप करून जनजाती बांधवांचे दिवाळी गोड करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कोप्रोली, विंधणे जांभूळपाडा या वाड्यांवर नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. कोप्रोली वाडीवर जाताना लहान डोंगर पार करून जायला लागते. नवीन कार्यकर्ते सोबत होते त्यांना ओझी वाहून थकायला झाले, परंतु जेव्हा खाऊ दिल्यानंतर लहान मुलांच्या चेहऱ्यावर हास्य प्रकटला तेव्हा सर्व थकवा निघून गेला, असे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सांगितले.



ते म्हणाले की, विंधने वाडीवर बालसंस्कार वर्गातील मुलांनी सुंदर कविता बोलून दाखविली आणि शहरापासून दूर असलो तरी आम्हीही काही कमी नाही त्याचे जणू काही प्रात्यक्षिकच दाखवून दिले. वेश्वी वाडीवर मिठाई वाटप करीत असताना अचानक समोर एक किल्ला दिसला मुरूड जंजिरा किल्ला सारखा तो किल्ला वाटला आणि त्या मुलाला विचारले कोणता किल्ला आहे तो म्हणाला, मुरूड जंजिरा आणि नंतर त्या मुलास त्याचे नाव विचारले तेव्हा त्याने अमित कातकरी, असे नाव सांगितले.

उरण येथील बगाडे मॅडम यांनी सूचविलेल्या ज्या गुणी मुलाचा आम्हाला शोध घ्यायचा होता तो प्रत्यक्ष तिथे आम्हाला दिसला आणि हा किल्ला बनवून त्याने त्याच्यातील कलागुणांची छोटीशी झूनुकच आम्हाला दाखवून दिली, अशी माहिती मनोज ठाकूर यांनी दिली.

हस्ताक्षर, चित्र काढणे, अभ्यास या सर्वांत हा मुलगा फारच कलागुणी दिसला. त्याला पुढील अभ्यासासाठी कोणतीही मदत पाहिजे असल्यास कल्याण आश्रम तुला ती करेल, अशी ग्वाही उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिली. जांभूळ पाड्यात वयस्कर आजी आजोबांना मिठाई देताना त्यांच्या डोळ्यातील भाव पाहून फारच समाधान वाटले. सर्व वाड्यांवर भगवान बिर्सा मुंडा यांचे जयंती निमित्ताने भित्तीपत्रे चिकटविण्यास आली. या वेळी तेथील जमलेल्या सर्व जनजाती बांधवांना येता विधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून दिलेल्या मतदानाचा अधिकार वापरून १०० टक्के मतदान करण्याचे आवाहन वनवासी कल्याण आश्रमचे वतीने अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी केले.

या कार्यक्रमासाठी सहसचिव कुणाल शिसोदिया, कोकण प्रांत बाल संस्करवर्ग प्रमुख सुनंदा कातकरी, ॲड. आकाश शाह, सोहम दर्णे, सुश्मिता दर्णे, अद्वैत ठाकूर, ऋग्वेद ठाकूर, अर्णव ठाकूर, निहाल गुडेकर ही मंडळी वाडीवरील जनजाती बांधवांना आनंद देण्यासाठी उपस्थित होते. बीना इंनवेस्टरचे विपुल भाई शहा, सुशील दर्ने, जितेंद्र पटेल यांचे या उपक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले.

# सिंधुदुर्ग संघातर्फे गतिमंद मुलांना सहाय्य




**पनवेल : वार्ताहर**

तारांगण निवासी कार्यशाळा, शिरवली, मुरबाड या संस्थेतील गतिमंद मुलांच्या कलेला प्रोत्साहन आणि आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ या संस्थेने पुढाकार घेतला.

या शाळेतील गतिमंद मुलांनी आकर्षक पणत्या बनविल्या होत्या. या संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. यासाठी त्यांनी तयार केलेले हे संच विक्री करण्यासाठी संघाने पुढाकार घेतला. आपल्या सभासदांमार्फत त्याची विक्री करून तारांगण संस्थेला सहाय्य केले.

प्रिया खोबरेकर व प्रशांत खोबरेकर या सभासद दांपत्याने पुढाकार घेवून मुलांची दिवाळी आनंदात साजरी होण्यासाठी मदत केली. या कार्याला संघाचे अध्यक्ष केशव राणे, बाबाजी नेरूरकर, रामचंद्र मोचेमाडकर, अशोक चव्हाण, वासुदेव सावंत व इतर कार्यकर्त्यांनी हातभार लावला. तारांगण गतिमंद शाळेचे संचालक विकास म्हारसे यांनी, आत्ता पर्यंतची या संचांची सर्वात विक्रमी विक्री करून मोलाचे सहाय्य केल्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाचे विशेष पत्र देऊन आभार मानले.

संघाच्या सदस्य परिवारांनी उस्फूर्तपणे या उपक्रमात सहभागी होऊन एक चांगला आदर्श समाजासमोर ठेवला आहे आहे, अशी प्रतिक्रिया सिंधुदुर्ग संघाचे जेष्ठ सल्लगार रामकृष्ण (भाई) परब यांनी दिली.

# खारघर येथील आश्रमात मिठाईचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी हा सण भारतात मोठ्या स्तरावरती साजरा केला जातो. ईट प्ले रीडच्या अभियानाच्या दृष्टिकोनातूनदेखील हा उत्सव आनंदाने साजरा करण्यात आला. यंदा हि दिवाळी ईट प्ले रीड संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांचा अभियाना संदर्भ हेतू घेवून त्यांच्या राजदूतांच्या माध्यमातून जीवन ज्योती आश्रमात प्रेमळ भेट देण्यात आली.

आपण समाजाचे एक घटक म्हणून आपली ही समाजासाठी काही जबाबदारी आहे. आपल्या परीने आपण कार्य करावे. ईट प्ले रीडच्या माध्यमातून मी व माझी टीम एक अभियान राबवत आहोत जे समाजाच्या सवयीना चांगल्या सवयी मध्ये परिवर्तन करण्यात कार्यरत असल्याचे अपर्णा शाह यांनी सांगितले. केवळ खाणे नसून ते विचारपूर्वक खा, केवळ खेळ नसून मजेशीर खेळा, केवळ वाचन नसून कुतूहलाने वाचा हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. खारघरमधील आश्रमात अभियाना अंतर्गत सर्व सामान्य, असामान्य लोकांपर्यंत पोहचून हा आनंद साजरा करण्यात आला.



शारीरिक व मानसिक आजार असणाऱ्या नागरिकांसोबत हितगुज साधून गप्पा गोष्टी करण्यात आल्या. संस्थेची ही भेट हा त्यांच्यासाठी खऱ्या अर्थाने दिवाळी आहे असे त्यांनी व तेथील प्रबांधकानी नमूद केले. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या आणि या गोड दिवशी गोड भेट करून गोड मिठाईचा वाटप ही करण्यात आले.

# उरणमध्ये भव्य रांगोळी प्रदर्शन; नागरिकांचा प्रतिसाद

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

दिपावली निमित्त रंगवली कलादर्शन उरण आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील एन आय हायस्कूल येथे भव्य रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १ तर संध्याकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी सुरू आहे.

रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन एन आय हायस्कूलचे चेअरमन सदानंद गायकवाड, चंद्रकांत ठक्कर, संजीव अगरवाल यांच्या हस्ते शनिवारी (दि.२) झाले. रांगोळी प्रदर्शन हे सर्व नागरिकांना ९ नोव्हेंबरपर्यंत सकाळी १० ते दुपारी १ तर संध्याकाळी ४ ते रात्री ९ वाजेपर्यंत विनामूल्य पाहता येणार आहे. थ्रीडी रांगोळी, व्यक्तीचित्र, निसर्गचित्र असे विविध प्रकाराचे रांगोळी काढण्यात आले आहेत.जेष्ठ कलाकार नंदकुमार साळवी यांच्या रांगोळी कारकिर्दीला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यामुळे त्यांच्याही कलाकृतीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. रांगोळी कला बघण्यासाठी नागरिकांची मोठया प्रमाणात गर्दी होत आहे.



नंदकुमार साळवी, दर्शन पाटील, सिद्धार्थ नागवेकर, नवनित पाटील, सत्या कडू, संतोष पाटील, राजेश नागवेकर, स्वप्नाली मणचेकर, ध्रुव म्हात्रे, वैष्णवी जाधव आदि कलाकांरानी उत्कृष्ठ असे रांगोळी काढून प्रेषकंची मने जिंकली आहेत. कलाकारांची कला जनते समोर यावी. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळावे.

दिवाळीमध्ये नागरिकांना रांगोळी कलेचा आनंद लुटता यावा या दृष्टीकोनातून उरण मध्ये रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आल्याचे सांगत जास्तीत जास्त नागरिकांनी हे रांगोळी प्रदर्शन आवर्जुन पहावे, असे आवाहन नंदकुमार साळवी, राजेश नागवेकर यांच्यासह अन्य कलाकारांनी केले आहे.

# मुख्यमंत्री सुंदर शाळा अभियानात तळोजा पाचनंद शाळा अव्वल

**खारघर : प्रतिनिधी**

शाळांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान शासनाने सुरू केले आहे. या अभियानामुळे शाळांना लाखो रुपयांचे बक्षिस मिळणार असून या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील तळोजा पाचनंदमधील रायगड जिल्हा परिषदेची मराठी शाळा अव्वल आली आहे. या शाळेला तीन लाखांचे पारितोषिक मिळणार आहे.

या उपक्रमात रायगड जिल्हा परिषदेची बेलवली शाळा द्वितीय तर पनवेल महापालिकेची श्री गणेश विद्या मंदिर शाळा क्रमांक ६ला तिसरा क्रमांक मिळाला आहे. शासकीय उपक्रमात शाळेचा सहभाग, विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास तसेच पायाभुत सुविधा या बाबींचा मूल्यांकन करून शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्गात पुरस्कार वितरित केला जातो. तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या शाळांना बक्षिसांची रक्कम अनुक्रमे तीन लाख रुपये दोन लाख रुपये, एक लाख रुपये आहे. निर्धारित गुण शाळांचे मूल्यांकन सुरू झाले असून, विद्यार्थिकेंदित उपक्रमांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग यावर एकूण ६० गुण तर शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम आणि त्यातील विविध घटकांचा सहभाग यावर एकूण ४० गुण अशा १०० गुणांचे मूल्यांकन या अभियानात केले जाते.

या घटकांचा अंतर्भाव संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख, अंगभूत कला क्रीडा गुणांचा विकास अशा अनेक विविध घटकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

> **पनवेल तालुक्यातील मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानात निवड झाली आहे. लवकरच या शाळांची बक्षीस रक्कम आम्हाला प्राप्त होईल. त्यानंतर या शाळांना हा निधी वितरित करण्यात येईल.**
> **–एस. आर. मोहिते, गटशिक्षणाधिकारी, पनवेल**

# कचरावेचक महिलांसोबत भाऊबीज साजरी



**नवी मुंबई : बातमीदार**

प्रतिवर्षीप्रमाणे नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने यंदादेखील वाशी येथील सेक्टर ३० परिसरात वास्तव्यास असलेल्या कचरावेचक भगिनींसोबत व त्यांच्या कुटुंबियांसोबत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दशरथ भगत यांनी संस्थेच्या सहकाऱ्यांसह भाऊबीज व दीपावली सण साजरा केला.

उपस्थित सर्व भगिनींच्या परिवाराला दिवाळीनिमित्त घरगुती फराळ भेट तसेच त्यांच्या सर्व लहान मुलांना प्रदूषणमुक्त फटाक्यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी नवी मुंबईच्या स्वच्छतेत योगदान देणाऱ्या या भगिनींनी दशरथ भगत यांचे औक्षण केले व मिठाईचा गोड घास भरवून, आशीर्वाद दिले. या वेळी भगत यांनी सुद्धा या गोरगरीब भगिनींना नेहमीप्रमाणे तुमच्या सुखदुः खात खंबीरपणे पाठीशी राहणार असल्याचे आश्वासन देऊन, दररोज जमा कचऱ्यातुन रिसायकल पद्धतीचा अवलंब करून त्यांच्या कुटुंबाची आर्थिक उन्नती कडे वाटचाल कशी होईल याबाबतीत प्रकल्प राबविणार असल्याचे विचार व्यक्त केले.

या उपक्रमात संस्थेचे मार्गदर्शक संदीप करसन भगत, शैलेश घाग, दीपक हन्नेहल्ली, सुजित खारकर व अन्य सदस्य सहभागी झाले होते.

# खालापूर नगरपंचायतीचा मालमत्ता करवाढीचा प्रस्ताव

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत खालापूर हद्दीतील सर्व नागरिकांना पुनर्मूल्यांकन मालमत्तेची विशेष नोटीस पाठवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. पुढील पाच वर्षांत होणाऱ्या करवाढीमुळे सामान्यांचे कंबरडे मोडणार आहे.

नगरपंचायत खालापूर स्थापन होऊन आठ वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे. नगरपंचायत आल्यामुळे खालापूर शहरातील मुख्य समस्या पाणी, आरोग्य सुविधा, वाहनतळ, खेळाचे मैदान सुटतील अशी नागरिकांची अपेक्षा होती, परंतु या समस्या जैसे थे आहेत.



मागील अनेक वर्षात नागरिकांना शुद्ध पाणी आलेले नाही. अशी परिस्थिती असतानादेखील मालमत्ता वार्षिक पुनर्मुल्यांकन प्रस्तावित असून दर पुढील पाच वर्षांतकरिता अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के, १०० टक्के याप्रमाणे लागू राहणार आहे.

**नोटीस तारखेपेक्षा १५ दिवस उशिरा**

आकारणीसंबंधी काही सूचना हरकत असल्यास ती, ही नोटीस प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत नगरपंचायतीकडे लेखी दाखल करावी, असे आवाहन करण्यात आले आहे, परंतु नोटीस तारखेपेक्षा १५ दिवस उशीरा नोटीस मिळत असल्याने नागरिक संभ्रमात आहेत.

**नगरपंचायत नागरिकांना कोणत्याही सोयीसुविधा पुरवत नसताना मालमत्ता करात वाढ करत आहे, हे अन्यायकारक आहे. याबाबतीत हरकत घेणार आहोत.**
**नवीनचंद्र घाटवळ, नागरिक**

**आकारणीसंबंधी काही सूचना, हरकत असल्यास नगरपंचायत कार्यालयात नोंदवून घेतली जात आहे. याबाबत अधिक जनजागृती दवंडीच्या माध्यमातून करण्यात येईल.**
**–अक्षय लोंढे, कर निरीक्षक**

# मतदान करूया, लोकशाही मजबूत करूया!

**पाली : प्रतिनिधी**

## विद्यार्थ्यांकडून नागरिकांना मतदानाचे आवाहन

राजिप मायनी शाळेतील विद्यार्थ्यांनी दीपावलीनिमित्त अनोखा उपक्रम राबविला आहे. घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना नुकतेच सुगंधी उटण्याचे वाटप केले, तसेच येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनतेमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण होऊन मतदानाचा हक्क बजवावा यासाठी उठण्याच्या पाकिटांवर मतदान करूया, लोकशाही मजबूत करूया, असा संदेश लिहिण्यात आला आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये घसरलेला मतदानाचा टक्का सर्व राजकीय पक्षांसोबतच निवडणूक आयोगासाठी चिंतेचा विषय होत आहे. निवडणूक आयोग स्वीप अंतर्गत मतदान जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवत असते. त्या अनुषंगाने पेण तालुक्यातील राजिप मायनी या शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान समाजासाठी मौल्यवान सेवा आणि उत्पादक कार्य म्हणजे कार्यानुभव विषयांतर्गत अनेक उपक्रम राबवताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता, नियोजन व व्यवस्थापन हे गुण विकसित होतात अशी माहिती मुख्याध्यापक रामकृष्ण भोईर यांनी दिली.

# अलिबागमध्ये काँग्रेसचे राजा ठाकूर यांची माघार

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग, मुरुड व रोहा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतील पक्ष शेकापच्या चित्रलेखा पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. काँग्रेसचे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष राजा ठाकूर यांनीही अर्ज दाखल केला होता, मात्र त्यांनी माघार घेत शेकापला बिनशर्त पाठिंबा दर्शविला आहे.

पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनुसार काँग्रेसचे उमेदवार राजा ठाकूर यांनी सोमवारी (दि. ४) त्यांचा अर्ज मागे घेत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना पाठिंबा दर्शविला. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.




## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **बामी सुदाम गावंड मयत हयांचे वारस**
**१) कै. कामिना परशुराम पाटील मयत मुलगी हिचे वारस**
**१अ) कै. खुशाल परशुराम पाटील मयत मुलगा व नातु हयांचे वारस**
१अ – **१) लिलावती खुशाल पाटील** १अ – **३) अपर्णा अभिमन्यू ठाकूर**
१अ – **२) जगदिश खुशाल पाटील** १अ – **४) धर्मेंद्र खुशाल पाटील**
यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.
मिळकतीचे वर्णन : मौजे : सारडे (५५३३४३)
(PU-ID 22792198391), तालुका – उरण, जिल्हा – रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १८२/६ | १ | ०.२५.६० पो.ख. ०.००.७० | ५.८७ |
| | | एकुण ०.२६.३० | |

**एकुण क्षेत्र ०.२६.३० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/११/२०२४

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२,कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा – रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **प्रकाश पांडुरंग गावंड, दयानंद पांडुरंग गावंड व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID 20951704591), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१३/६ खाते क्रमांक : ३४७ | १ | ०.१२.४० पो.ख. ०.०१.०० | १.४४ |
| | | एकुण ०.१३.४० | |

**एकुण क्षेत्र ०.१३.४० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/११/२०२४

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड क्रमांक – ३३/३४, सेक्टर २२,कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा – रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे आवरे, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री. जोमा हरी गावंड व इतर यांच्या मालकीची आहे.

| मालकाचे नाव | मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १. जोमा हरी गावंड<br>२. पार्वती गजानन गावंड<br>३. मनोहर गजानन गावंड<br>४. सविता प्रशांत म्हात्रे<br>५. रूपेश गजानन गावंड<br>६. स्वाती दर्शन तिलोरे | आवरे | २१८/३२ | ०–०५–००<br>पो.ख.०–००–००<br>एकूण ०–०५–०० | ०.९० |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ४/११/२०२४

**सही/–**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
ॲडव्होकेट
९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी, उरण, ता. उरण. फोन नं. ८८७९१४१२३२



## जोडपत्र ४७
### प्रपत्र क – १

सदर प्रपत्र, उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या दुस–या दिवसापासून आणि मतदानाच्या तारखेच्या दोन दिवस आधीपर्यंत वृत्तपत्रामध्ये आणि दूरदर्शनवर प्रसिध्द करता येईल.

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दूरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या निकालानुसार.

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **श्री. महेश रतनलाल बालदी**
घर नं. ६०४ ब, राधाकुंज बंगला, नागांव रोड, ता. उरण, जि. रायगड, महाराष्ट्र ४००७०२.

**राजकीय पक्षाचे नाव** : भारतीय जनता पार्टी
(अपक्ष उमेदवारांनी येथे ''अपक्ष'' असे लिहावे )

**निवडणूकीचे नाव** : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४

**मतदारसंघाचे नाव** : १९० उरण विधानसभा मतदारसंघ

मी, **श्री. महेश रतनलाल बालदी** (उमेदवाराचे नाव) वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्राबदद्लचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

**(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती | संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे ) थोडक्यात वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | JMFC उरण | SCC १४५/२०२३ गुन्हा रजि. नं. २४५/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| २ | सत्र न्यायालय अलिबाग | खाजगी खटला सेशन केस–४०/२०२३ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३५३ सरकारी कामात अडथळा निर्माण करणे. |
| ३ | JMFC उरण | SCC ३८/२०२३ गुन्हा रजि. नं. ५५/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. ३४१,१८८, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) (३), १३५ सरकारी नियमांचे पालन न करणे. |
| ४ | JMFC उरण | SCC ३५/२०२३ गुन्हा रजि. नं. १८४/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम – ३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ५ | JMFC पनवेल | SCC ३६१८/२०२२ गुन्हा रजि. नं. ३२/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३), १३५ कोविड कालवधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ६ | JMFC पनवेल बेलापूर,जि.ठाणे. | SCC २९२४/२०२२ गुन्हा रजि. नं. १४७/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अद्यापी दोषारोप ठेवण्यात आला नाही. | भा.दं.वि. १४३, ३४१, १८८, २६९, २७०, साथीचे रोग अधिनियम कलम ३ महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७(१) (३),१३५, ११५, ११७ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम कलम ३, ध्वनीप्रदुषण नियमन कलम १५ व १९ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे व ध्वनीप्रदुषण करणे. |
| ७ | CJM अलिबाग | SCC १३९७/२०२२ गुन्हा रजि. नं. १८३/२०२२ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७०, EC ॲक्ट कलम–३ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे. |
| ८ | CJM अलिबाग | SCC १३९६/२०२२ गुन्हा रजि. नं. २४८/२०२१ | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०३/०२/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याचीं संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. १८८, २६९, २७० पोलिस अधिनियम ३७ (१) (क), १३५ कोविड कालावधीत नियमांचे उल्लंघन करणे व लोक जमा करणे. |
| ९ | CJM अलिबाग | RCC ८३/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ११/०१/२४ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | पर्यावरण संरक्षण कायदा कलम –१५ ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम कलम – १९ गणेशोत्सव मिरवणुकी दरम्यान स्पिकर लावुन ध्वनीप्रदुषण करणे. |
| १० | CJM अलिबाग | RCC ८२/२०२० गुन्हा रजि. नं. २४/२०१० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. २८/०८/१३ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२५, ३२४, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. |
| ११ | CJM अलिबाग | खाजगी खटला RCC ८१/२०२० | सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये दि. ०७/०६/२२ रोजी दोषारोप ठेवण्यात आला आहे व खटल्याची संपरिक्षा सुरू आहे. | भा.दं.वि. ३२४, ३२३, ५०४, ५०६(२),५०९, ३४, १४७, १४८ मारहाण करणे व शिवीगाळ करणे. गैरकायद्याची मंडळी जमविणे, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे. |

**(ड) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | ठोठावलेली सर्वाधिक शिक्षा |
|---|---|---|---|
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| लागू नाही | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

* राज्यसभेच्या निवडणुकीच्या किंवा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या बाबतीत विधानसभा सदस्यांनी मतदारसंघाच्या नावाच्या जागी संबंधित निवडणुकीचे नाव नमुद करावे.

**टिप : –**

१. उमेदवारांविरूध्दच्या प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबाबतचा तपशील ठळक अक्षरात असावा.
२. वृत्तपत्रांमधील मजकूर किमान १२ या टंक (फॉंट) आकारात असावा.
३. प्रत्येक प्रकरणासाठी स्वतंत्र तपशील द्यावा.
४. एखादा उमेदवार एखादया विशिष्ट पक्षाच्या तिकीटावर निवडणूक लढत असेल तर, त्याने/तिने पक्षाला त्याच्या/तिच्या विरूध्द प्रलंबित असलेल्या फौजदारी खटल्यांबदद्ल माहिती देणे आवश्यक आहे.
५. उमेदवाराने प्रसिध्दी नंतर लगेच फौजदारी खटल्यांबाबत घोषणापत्र प्रसिध्द करण्याबाबत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास अहवाल द्यावा. याशिवाय, तो, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत निवडणूक खर्चाच्या हिशेबासह प्रपत्र क्र. ४ मधील प्रकरणांबाबत घोषणापत्र प्रकाशित करण्याबाबतचा अहवाल सादर करील. (क) लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. (ख) राज्यसभा आणि राज्य विधानपरिषदेच्या निवडणुकांच्या बाबतीत, हा अहवाल संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

# ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका ठरणार महत्त्वपूर्ण

## भारताच्या वरिष्ठ खेळाडूंबाबत बीसीसीआय घेणार निर्णय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडने भारताविरुद्धची तीन सामन्यांची कसोटी मालिका ३–० अशी जिंकली. या लाजिरवाण्या पराभवामुळे चाहतेच नाही, तर बीसीसीआयचे अधिकारीही संतापले आहेत. त्यामुळे बोर्डाने आता कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.

वृत्तानुसार, टीम इंडियाच्या अनेक वरिष्ठ खेळाडूंच्या कसोटी कारकिर्दीचा निर्णय ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर होणार आहे, कारण भारताला २४ वर्षांनी पहिल्यांदाच मायदेशात ३–० अशा फरकाने मालिका गमवावी लागली आहे. रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जडेजा आणि रविचंद्रन अश्विन यांच्या किमान दोन खेळाडूंसाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धची पाच सामन्यांची कसोटी मालिका शेवटची ठरण्याची दाट शक्यता आहे. हे चार खेळाडू त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहेत.



बीसीसीआयच्या निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर, मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि कर्णधार रोहित यांच्यात वृद्ध खेळाडूंसह संघ पुढे जाण्याबाबत अनौपचारिक चर्चा होऊ शकते. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, निश्चितपणे संघाचे मूल्यांकन केले जाईल आणि ते अनौपचारिक असू शकते, कारण संघ १० नोव्हेंबरला ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना होणार आहे. हा एक मोठा पराभव आहे, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका जवळ आली आहे आणि संघ आधीच जाहीर झाला आहे. त्यामुळे आता संघात कोणतीही बदल केला जाणार नाही.

जर भारत इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या डब्ल्यूटीसी फायनलसाठी पात्र ठरला नाही, तर या चारपैकी काही नावे इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत नसण्याची दाट शक्यता आहे. या चौघांनी घरच्या मैदानावर आपला शेवटचा कसोटी सामना एकत्र खेळला असावा.

### ‘डब्ल्यूटीसी’साठी चुरस

या कसोटी चॅम्पियनशिप सायकलमध्ये भारताने एकूण १४ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये संघाने आठ सामने जिंकले, पाच गमावले आणि एक सामना अनिर्णित राहिला. कसोटी मालिकेत भारताचा ३–० असा पराभव केल्यानंतर न्यूझीलंड संघ आता गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. किवी संघाने ११पैकी सहा सामने जिंकले असून पाच सामने गमावले असून या संघाची विजयाची टक्केवारी ५४.५५ आहे. श्रीलंकेचा संघ ५५.५६च्या विजयी टक्केवारीसह तिसऱ्या स्थानी आहे.

# देशांतर्गत क्रिकेटकडे दुर्लक्ष ठरले मारक!

## ‘किवीं’विरुद्ध लाजिरवाण्या पराभवानंतर मोठा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाच्या न्यूझीलंडविरुद्धच्या कामगिरीनंतर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. सरावाचा अभाव खेळाडूंच्या कामगिरीत दिसून आला. या घरच्या मालिकेपूर्वी भारतीय संघातील शिलेदारांना दुलीप ट्रॉफीद्वारे सराव करण्याची आयती संधी चालून आली होती, पण देशांतर्गत क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोन अद्यापही बहुतांश खेळाडूंचा म्हणावा तसा चांगला नाही.



सुनील गावसकर यांनी एका वृत्तसमुहाशी बोलताना सांगितले की, भारतीय संघातील खेळाडूंनी थोडा सराव करायला हवा होता. खूप काळानंतर खेळाडू मैदानावर उतरणार होते. आम्हाला माहीत आहे की संघाने बांगलादेशला हरवले. यानंतर न्यूझीलंडला हरवणे सोपे जाईल असे वाटू लागले. न्यूझीलंडची कामगिरी अधिक चांगले होती. त्यांचे खेळाडू भारतात आयपीएल खेळतात आणि येथील खेळपट्टी कशी असते हे त्यांना माहित आहे.

मीडिया रिपोर्टनुसार देशांतर्गत हंगाम सुरू होण्यापूर्वी बोर्डाने संघातील सर्वच खेळाडूंना दुलीप ट्रॉफीमध्ये खेळण्यास सांगितले होते, मात्र त्या वेळी वरिष्ठ खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास नकार दिला होता. घरच्या मैदानावर होणाऱ्या कसोटी हंगामाच्या आधी खेळाडूंनी मालिकेची तयारी म्हणून दुलीप ट्रॉफीमध्ये खेळत सामन्यांसाठी सराव करावा अशी निवड समितीची इच्छा होती, पण खेळाडूंनी देशांतर्गत स्पर्धा खेळण्यास नकार दिला.

संघाचे वरिष्ठ खेळाडूही त्यांच्या सर्वोत्तम कामगिरीची छाप पाडू शकले नाहीत. कर्णधार रोहित शर्मा आणि स्टार फलंदाज विराट कोहली यांनी निराश केले. या दोन्ही फलंदाजांसाठी ही मालिका फारच निराशाजनक ठरली. शेवटच्या ११० डावांमध्ये कोहलीने १९२ धावा केल्या, तर शर्माने फक्त १३३ धावा केल्या आहेत. दोघांनीही गेले अनेक वर्ष देशांतर्गत क्रिकेट खेळलेले नाही. रोहित २०१५मध्ये अखेरची रणजी ट्रॉफी स्पर्धा खेळला आहे, तर कोहली २०१२मध्ये अखेरचा देशांतर्गत सामना खेळताना दिसला होता.

विराट कोहली, रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि अश्विन हे दुलीप ट्रॉफीमध्ये सहभागी झाले नव्हते. त्यामुळे नंतर बोर्डाने रवींद्र जडेजालाही रिलीज केले, जो देशांतर्गत क्रिकेट खेळण्यास तयार होता. शुबमन गिल, सर्फराज खान, ऋषभ पंत, यशस्वी जैस्वाल, केएल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी दुलीप ट्रॉफीमध्ये सहभाग घेतला. या सर्वच खेळाडूंनी गेल्या पाच कसोटी सामन्यांमध्ये कमीत कमी एका डावात तरी चांगली कामगिरी केली आहे.

### आधी सहमती, नंतर माघार

भारतीय संघाने जूनमध्ये टी–२० विश्वचषक जिंकला होता. यानंतर संघाला घरच्या मैदानावर बांगलादेशविरुद्ध मालिका खेळायची होती. अहवालानुसार निवड समितीने बंगळुरू आणि अनंतपूर येथे होणाऱ्या दुलीप ट्रॉफी सामन्यांसाठी वरिष्ठ खेळाडूंसहित सर्वांनी उपलब्ध राहावे असा निर्णय घेतला होता. हे सामने ५ ते २२ सप्टेंबरदरम्यान होणार होते. बोर्डाच्या म्हणण्यानुसार यामुळे खेळाडूंना मॅच सराव करता आला असता. रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासह टीम इंडियाच्या अनेक बड्या खेळाडूंनी याआधी सहमती दर्शवली होती, मात्र नंतर त्यांनी माघार घेण्याचा निर्णय घेतला. या खेळाडूंनी थेट बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिका खेळली आणि त्यानंतर न्यूझीलंडविरुद्धची मालिका खेळली.

# न्यूझीलंड ‘सातवे आसमान’पर; भारतीय भूमीवर केले विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडने भल्याभल्या संघांना जमलेले नाही ते भारत दौऱ्यात करून दाखवले. कसोटीत भारताला भारतात चारीमुंड्या चीत करण्याचा पराक्रम न्यूझीलंडने केला. ‘किवीं’नी न भूतो न भविष्यती कामगिरीसह असंख्य वैयक्तिक आणि सांघिक विक्रम रचले.

भारतीय संघ मायदेशात खेळताना पहिल्यांदाच तीन किंवा त्यापेक्षा जास्त सामन्यांच्या मालिकेत चीत झाला. याआधी मायदेशात भारतीय संघ केवळ दोनदा पूर्ण पराभूत झाला आहे. २००० साली दक्षिण आफ्रिकेने दोन सामन्यांच्या मालिकेत निर्भेळ यश मिळवले होते. १९८०मध्ये इंग्लंडने एकमेव कसोटीत भारताचा पराभव केला होता. १९८३नंतर मायदेशात सलग तीन कसोटी गमावण्याची ही पहिलीच वेळ आहे. न्यूझीलंडने पहिल्यांदाच कसोटी मालिकेत तीन सामने जिंकण्याचा पराक्रम केला, तर त्यांच्या एझाझ पटेलने मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर केवळ दोन कसोटीत तब्बल २५ विकेट्स पटकावल्या आहेत. भारताविरुद्ध भारतात एकाच मैदानावर इतक्या विकेट्स घेण्याचा विक्रम एझाझच्या नावावर आहे. शिवाय विदेशात एकाच मैदानावर सामन्यात १० किंवा त्यापेक्षा जास्त विकेट्स पटकावणारा एझाझ केवळ आठवाच खेळाडू.

घरच्या मैदानावर खेळताना २०० किंवा त्यापेक्षा कमी लक्ष्य गाठताना भारताची कामगिरी ३० विजय आणि एक हार अशी होती. मुंबईतला पराभव भारतासाठी अशा स्वरूपाचा पहिलाच पराभव. कर्णधार म्हणून रोहित शर्माचा मायदेशातला पाचवा पराभव. या नकोशा यादीत संयुक्तपणे दुसऱ्या स्थानी आला.

याआधी कसोटी इतिहासात केवळ एकदा, एका सामन्यात दोन डावखुऱ्या गोलंदाजांनी डावात १० विकेट्स घेतल्या आहेत. एझाझ आणि रवींद्र जडेजा यांनी इक्बाल कासिम आणि रे ब्राईट यांच्या १९८०मधील विक्रमाची बरोबरी केली.

### महाराष्ट्राची कबड्डी लीग मे महिन्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या विद्यमाने पुढील वर्षी मे महिन्यात महाराष्ट्राची कबड्डी लीग घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी दिली.

पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात नुकत्याच झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत या विषयावर धोरणात्मक चर्चा करून मंजुरी घेण्यात आली. याबाबत चांदेरे यांनी सांगितले की, लीगकरिता पुरुष आणि महिलांचे असे एकूण १६ संघ तयार करण्यात येतील. यासाठी खेळाडूंची लिलाव प्रक्रिया राबवण्यात येईल. राज्यातील प्रो कबड्डी लीग खेळलेल्या खेळाडूंचाही या लीगमध्ये समावेश असेल. इतर राज्यातील (बाहेरील राज्यातील) एका खेळाडूस प्रत्येक संघात स्थान देण्यात येईल. राज्यातील पुणे आणि मुंबई या दोन शहरांत ही स्पर्धा घेण्यात येईल. स्पर्धा साधारणत: पुढील वर्षाच्या मे महिन्यात घेण्याचा संघटनेचा मानस आहे. लीगचे नियम आणि अटी लवकरच निश्चित करण्यात येणार आहेत.

चांदेरे यांनी पुढे बोलताना, यापुढे खासगी संस्थांना कबड्डी लीग घेण्यासाठी राज्यात परवानगी देण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले.



## वृद्धिमान साहाची निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा खेळाडू वृद्धिमान साहा याने या खेळाच्या सर्व प्रकारातून निवृत्तीची घोषणा केली आहे.

वृद्धिमान साहा २०१० ते २०२१ या कालावधीत भारतीय संघाकडून ४० कसोटी सामने खेळला आहे. याशिवाय नऊ वनडे सामन्यातही त्याने भारतीय संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. आंतरराष्ट्रीय टी–२० क्रिकेटमध्ये मात्र त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. आयपीएलमध्ये त्याने पाच फ्रँचायझी संघाचे प्रतिनिधीत्व केले. यात कोलकाता नाईट रायडर्स, चेन्नई सुपर किंग्स, पंजाब किंग्स, सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स या संघांचा समावेश आहे.

साहा देशांतर्गत क्रिकेटमध्ये बंगाल संघाकडून खेळतो. सध्याच्या घडीला तो या संघाकडून रणजी स्पर्धेत उतरला आहे. या स्पर्धेनंतर तो आयपीएलमध्येही सहभागी होणार नाही असे समोर आले आहे.

# भारत वि. दक्षिण आफ्रिका टी–२० मालिका

**डर्बन : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने नुकतीच न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळली. या मालिकेत टीम इंडियाचा ३–० असा पराभव झाला. या पराभवामुळे भारतीय संघाला जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, आता टीम इंडिया पुढील मालिकेसाठी सज्ज झाली आहे. भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध चार सामन्यांची टी–२० मालिका खेळणार आहे.

भारत वि. दक्षिण आफ्रिकेतील टी–२० मालिका ८ नोव्हेंबरपासून खेळवली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघही दक्षिण आफ्रिकेत पोहचला आहे. मालिकेतील पहिला सामना ८ नोव्हेंबर रोजी किंग्समीड, डर्बन येथे होणार आहे. दुसरा सामना १० नोव्हेंबर रोजी सेंट जॉर्ज पार्क, गकेबरहा येथे, तिसरा १३ नोव्हेंबर रोजी सेंच्युरियन येथील सुपरस्पोर्ट पार्क येथे आणि शेवटचा सामना १५ नोव्हेंबरला जोहान्सबर्ग येथे होणार आहे.



टीम इंडियाने या वर्षी टी–२० विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेला अंतिम फेरीत पराभूत करत विजेतेपद पटकावले. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात टीम इंडियाचा विक्रम खूपच अटीतटीचा आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण २७ टी–२० सामने खेळवले गेले आहेत, ज्यामध्ये टीम इंडियाने १५ सामने जिंकले आहेत, तर दक्षिण आफ्रिकेने ११ सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांमधील केवळ एका सामन्याचा निकाल जाहीर होऊ शकला नाही. या मालिकेत टीम इंडियाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे, तर दक्षिण आफ्रिकेचे कर्णधारपद एडन माक्रमकडे आहे.

**भारतीय संघ** : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग, तिलक वर्मा, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, रमणदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, अर्शदीप सिंग, विजयकुमार वैशाक, आवेश खान, यश दयाल.

**दक्षिण आफ्रिकेचा संघ** : एडन मारक्रम (कर्णधार), ओटनील बार्टमन, गेराल्ड कोएत्झी, डोनोव्हन फरेरा, रीझा हेंड्रिक्स, मार्को जॅन्सन, हेनरिक क्लासेन, पॅट्रिक क्रुगर, केशव महाराज, डेव्हिड मिलर, मिहलाली मॅपोंगवाना, नकाबा पीटर, रायन रिकेल्टन, एंडिले सिमलेन, लूथो सिम्पाला, ट्रिस्टन स्टब्स.

## पहिल्या वनडेत ऑस्ट्रेलियाकडून पाकिस्तान संघाचा पराभव

### मिचेल स्टार्कने घडवला इतिहास

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाने मेलबर्न येथे झालेल्या पहिल्या वनडे सामन्यात पाकिस्तानचा दोन विकेट्सनी पराभव केला. या सामन्यात पाकिस्तानने ४६.४ षटकात २०३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात यजमानांनी ३३.३ षटकांत आठ गडी गमावून २० धावा करून सामना जिंकला. पाकिस्तानकडून मोहम्मद रिझवानने सर्वाधिक ४४ धावांची खेळी साकारली. यादरम्यान ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली.

मिचेल स्टार्कने आपल्या वेगवान माऱ्याने पाकिस्तानी फलंदाजांना सर्वाधिक त्रास दिला. स्टार्कने १० षटकात केवळ ३३ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. यात त्याने तीन निर्धाव षटकेही टाकली. या चमकदार कामगिरीमुळे मिचेल स्टार्कने ऑस्ट्रेलियन भूमिवर इतिहास घडवला.

वास्तविक, मिचेल स्टार्कने पाकिस्तानचा सलामीवीर अब्दुल्ला शफीकच्या रूपाने पहिली विकेट घेतली. या विकेटसह स्टार्कने ऑस्ट्रेलियन भूमिवर एकदिवसीय क्रिकेटमधील १०० विकेट्सचा टप्पा पूर्ण केला. अशी कामगिरी करणारा तो सहावा ऑस्ट्रेलियन गोलंदाज ठरला. ब्रेट ली, ग्लेन मॅकग्रा आणि शेन वॉर्नसारख्या दिग्गज गोलंदाजांच्या क्लबमध्ये त्याने प्रवेश केला.

मिचेल स्टार्कच्या आधी ऑस्ट्रेलियाकडून मायदेशात १०० एकदिवसीय विकेट्स घेण्याचा पराक्रम ब्रेट ली, ग्लेन मॅकग्रा, शेन वॉर्न, क्रेग मॅकडरमॉट आणि स्टीव्ह वॉ यांनी केला होता. अब्दुल्ला शफीकची विकेट घेतल्यानंतर स्टार्कने सॅम अयुब आणि शाहीन आफ्रिदीची विकेट घेत ऑस्ट्रेलियात सर्वाधिक एकदिवसीय विकेट घेण्याच्या बाबतीत स्टीव्ह वॉलाही मागे टाकले.


# महिला क्रिकेट स्पर्धांमध्ये आता चॅम्पियन्स ट्रॉफीही रंगणार

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २०२५–२९साठी महिला क्रिकेट संघांचा फ्युचर्स टूर प्रोग्राम जाहीर केला आहे. यात महिला चॅम्पियनशिपच्या चौथ्या सीझनसाठी थोडे बदल करण्यात आले आहेत. या स्पर्धेसाठी संघांची संख्या वाढवण्यात आली आहे.

आयसीसीच्या मते २०२९च्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी ११ संघ महिला चॅम्पियनशिपच्या चौथ्या चक्रात भाग घेतील. या स्पर्धेत झिम्बाब्वे पदार्पण करणार आहे, जे महिला क्रिकेटमध्ये अधिक जागतिक प्रतिनिधित्वाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

महिला चॅम्पियनशिपमध्ये प्रत्येक संघ सध्याच्या चक्रासह इतर आठ संघांशी स्पर्धा करेल, तर चार घरच्या मैदानावर आणि चार



इतर संघांच्या मायदेशात जाऊन सामने खेळेल. या संपूर्ण स्पर्धेत ४४ मालिका खेळवल्या जातील, ज्यामध्ये एकूण १३२ एकदिवसीय सामने खेळले जातील. म्हणजेच प्रत्येक मालिकेत तीन सामने खेळवले जातील.

या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत असताना झिम्बाब्वे संघ बांगलादेश, भारत, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेचे यजमानपद भूषवणार आहे. याशिवाय झिम्बाब्वे संघ न्यूझीलंड, श्रीलंका, इंग्लंड आणि वेस्ट इंडिजचा दौरा करणार आहे.

२०२५ ते २०२९च्या चक्रामध्ये दरवर्षी एक आयससी महिला स्पर्धेचा समावेश असेल. २०२५मध्ये महिला क्रिकेट विश्वचषकापासून सुरुवात होईल. यानंतर २०२६मध्ये महिला टी–२० विश्वचषक खेळवला जाईल. सर्वात मोठी अपडेट म्हणजे महिला क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच चॅम्पियन्स ट्रॉफीचा समावेश करण्यात आला आहे. महिला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२७मध्ये आयोजित केली जाईल. यानंतर २०२८मध्ये महिला टी–२० विश्वचषक खेळवला जाणार आहे.

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन पुरुषांच्या क्रिकेटमध्ये दीर्घकाळापासून केले जात आहे, मात्र महिला क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच चॅम्पियन्स ट्रॉफीचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेच्या ठिकाणाबाबत अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या रूपाने भारतीय महिला क्रिकेट संघाला आता २०२७मध्ये आयसीसी विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची मोठी संधी आहे.

आयसीसी स्पर्धेच्या तयारीसाठी संघांनी परस्पर संमतीने त्रिकोणीय मालिका स्पर्धा आयोजित केल्या आहेत. २०२६मध्ये महिला टी–२० विश्वचषकापूर्वी इंग्लंड भारत आणि न्यूझीलंड या तीन संघांतील टी–२० मालिकेचे यजमानपद भूषवणार आहे, तर आयर्लंड पाकिस्तान आणि वेस्ट इंडिजचे यजमानपद भूषवणार आहे. श्रीलंका आणि वेस्ट इंडिज देखील अनुक्रमे २०२७ आणि २०२८मध्ये त्रिकोणी मालिका आयोजित करतील.

जीवेत् शरदः शतम्!
अभिमन्यू थोरात
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक
शुभेच्छा

शुभेच्छुक
नितीन म्हात्रे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com